नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

## मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार, २५ घरे जाळली

■ **वृत्तसंस्था, इम्फाळ, दि. ९ :**
मणिपूरमधील उखरुल जिल्ह्यातील व्यावसायिक शहर लितानमध्ये तणाव कायम आहे. तरीही, मोठ्या प्रमाणात सुरक्षा दलांच्या तैनातीमुळे सध्या परिस्थिती शांत आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, तांगखुल नागा आणि कुकी समुदायांमधील हिंसक संघर्षांनंतर लितान आणि त्याला लागून असलेल्या मंगकोट गावातून मोठ्या प्रमाणावर लोकांचे स्थलांतर सुरू आहे.
रात्री उशिरा लितान बाजारात हिंसाचार उसळला होता. यावेळी उपद्रवींनी स्वयंचलित शस्त्रे आणि रायफल्सने गोळीबारही केला, ज्यामुळे परिसरात दहशत पसरली. या हिंसाचारात २५ घरे आणि चार सरकारी निवासस्थाने जळून खाक झाली आहेत.

* वर्ष ५१ * अंक २१८ * * अमरावती * मंगळवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## बिर्लाजी की जय!




लोकसभेचे दुसऱ्यांदा अध्यक्ष झालेले ओम बिर्ला यांच्याविरुद्ध संपूर्ण विरोधी पक्षाने अविश्वास व्यक्त केलेला आहे. लोकसभेच्या अध्यक्षाने कुणाबाबतही पक्षपाती असू नये. मग तो सत्ताधारी पक्ष असो किंवा विरोधी पक्ष असो, असा पायंडा आहे. परंतु हे अध्यक्ष विरोधकांना बोलूच देत नाहीत. पंतप्रधानांच्या खालोखाल ज्या पदाचा मान आहे त्या विरोधी पक्ष नेत्यालाही बोलू देत नाहीत. असा त्यांच्यावर आरोप करण्यात आलेला आहे. मागील आठवड्यात ओम बिर्ला यांनी विरोधी पक्षाच्या महिला खासदारांच्या बाबतीत जे निवेदन केले. त्यामुळे विरोधी पक्षांच्या आरोपाच्या आगीत पेट्रोल ओतल्यासारखे झाले. संसदेत एवढा तगडा सुरक्षा बंदोबस्त असतानाही खासदार पदावर असलेल्या महिला पंतप्रधान यांच्यावर हल्ला करतील, किंवा करू शकतील, हे लोकसभा अध्यक्षांचे विधान म्हणजे केवळ विरोधी पक्षातील खासदार महिलांचाच अपमान नाही तर तो समस्त महिलांच्या विश्वासार्हतेचा अपमान आहे, असाही विरोधी पक्षाचा आरोप आहे. बिर्लाजी भारतीय जनता पक्षाचे खासदार आहेत ते पक्षनिष्ठ आहेत हे सर्वमान्य आहे. तसे त्यांनी असलेच पाहिजे कारण ज्याअर्थी मोदीजींनी त्यांना दुसऱ्यांदा अध्यक्षपद बहाल केले त्यावरून त्यांची पक्षनिष्ठा नक्कीच दिसून आलेली आहे. लोकसभेच्या भवनात लोकसभेचा अध्यक्ष सर्वोपरी असतो त्यामुळे खुद्द पंतप्रधानांनाही त्यांचे आदेश मानावे लागतात. अशा पदावर बसल्यानंतर अध्यक्ष ज्या पक्षाचे सदस्य असतात त्या पक्षाला थोड्याफार सुविधा देणे ही बाब तेवढी मनाला वेदना देत नाही. लोकसभेचे पहिले अध्यक्ष गणेश वासुदेव मावळंकर (दादासाहेब) आणि त्यानंतरचे अनेक अध्यक्ष तत्कालीन काँग्रेस पक्षाचेच खासदार होते त्यांनी विरोधी पक्षातील लोकांना बोलण्यासाठी कधीच मज्जाव केला नाही. त्या काळातील विरोधी पक्षाचे अनेक दमदार खासदार पंडित जवाहरलाल नेहरू काय, इंदिरा गांधी काय, राजीव गांधी काय, किंवा इतर पंतप्रधान काय, प्रत्येकावर घणाघाती टीका करत होते. लोकसभेमध्ये सत्ताधारी असलेल्या पक्षाला विरोधी पक्षाकडून झालेली टीका पचवता आली पाहिजे आणि तेवढ्याच दमदारपणे त्या टीकेला प्रत्युत्तर देता आले पाहिजे. यावेळी बिर्ला साहेबांनी चक्क विरोधी पक्ष नेत्यालाच बोलू दिले नाही आणि पंतप्रधानांना लोकसभेत येऊच दिले नाही. त्यामुळे या दोघांचेही भाषण न झाल्याने नवीन पायंडा पडला. बिर्ला साहेब सत्ताधारी पक्षाच्या खासदारांना वाट्टेल ते बोलू देतात, मात्र विरोधी पक्षाच्या खासदारांना बोलूच देत नाहीत हा गंभीर आरोप त्यांच्यावर करण्यात आलेला आहे. असाच प्रकार राज्यसभेतही जगदीप धनखड करीत होते त्यांच्याविरुद्धही अविश्वास प्रस्ताव आणण्याचा इरादा विरोधी पक्षाने केला होता. पण मग अविश्वास प्रस्तावाऐवजी त्यांचा रहस्यमय राजीनामा आला आणि ते उपराष्ट्रपती पद आणि राज्यसभेच्या सभापती पदावरून पायउतार झाले. लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सदनाचे कामकाज व्यवस्थितपणे चालवण्याचे कार्य ज्यांचे असते त्यांनी अत्यंत जबाबदारीने हे कार्य पार पाडावयाचे असते. पक्षनिष्ठा ठेवलीच पाहिजे पण आपल्या पदाचीही काही जबाबदारी आहे याचीही जाणीव ठेवली पाहिजे. उदाहरण म्हणून सांगायचे झाल्यास सोमनाथ चटर्जी सारख्या अध्यक्षांनी पक्षाने दिलेला आदेश चुकीचा आहे असे सांगून आपला पक्षही त्यांनी सोडला होता. बिर्लाजी तसे सौम्य आणि मनमिळाऊ आहेत, पण लोकसभा अध्यक्षाच्या खुर्चीवर बसल्यावर सत्ताधारी पक्ष जेव्हा बोलू लागतो. तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर ममतेचे हास्य दिसते आणि विरोधी पक्षाच्या बाबतीत नेमका उलटा प्रकार होतो, असे विरोधी पक्षाचे नेते म्हणतात. आता त्यांच्या मताशी आम्ही सहमत आहोत असे नाही. मात्र त्यामध्ये काही तथ्य किंवा सत्य असेल, तर हे वागणे बरे नव्हे! असे त्यांना कोणीतरी सांगितले पाहिजे आणि अध्यक्षांनीही ते ऐकले पाहिजे. लोकसभेच्या अध्यक्षांवर अविश्वास ठरावाची सूचना येणे, तिथे त्यावर चर्चा होणे. ही बाब गंभीरच आहे. शेवटी तो प्रस्ताव बारगळणे हे क्रमप्राप्त आहे पण त्यामुळे त्या पदाचा भविष्यकालीन प्रवास संविधानाला स्मरून होत नाही. असा ठपका जर का आला तर त्या पदाची गरिमा कायम राहील काय? हा आमचा साधा प्रश्न आहे, तरीही बिर्लाजी की जय म्हणा!

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

# झेडपीत महायुतीचा डंका

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर/मुंबई, दि. ९ :**
राज्यातील १२ जिल्हा परिषदा व १२५ पंचायत समितींच्या निवडणुकीत सत्ताधारी महायुतीचा डंका वाजला आहे. १२ जिल्हा परिषदांपैकी सर्वाधिक ७ जिल्हा परिषदांवर भाजपचा झेंडा फडकला आहे.
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना व दिवंगत अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला प्रत्येकी २ जिल्हा परिषदांवर समाधान मानावे लागले आहे. विरोधी बाकावरील महाविकास आघाडीला अवघी एक जिल्हा परिषद मिळाली आहे.
पंचायत समितीच्या निवडणुकीतही भाजपने सर्वाधिक पंचायत समित्या खिशात घातल्या आहेत. त्यानंतर शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस हे सत्ताधारी पक्ष अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर आहेत. महाविकास आघाडीचे तिन्ही घटकपक्ष एकेरी आकड्यात राहिल्याचे दिसते.
दरम्यान, या निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठ्या फरकाने पराभव पत्करावा लागला असून, अनेक दिग्गजांच्या नातेवाईकांना पराभवाचे तोंड पाहावे लागले. महाविकास आघाडीच्या पराभवानंतर सत्ताधारी भाजपा आणि शिंदेसेनेच्या मंत्र्यांनी त्यांच्यावर सडकून टीका केली असून, प्रधानमंत्री मोदी आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्या विकासाचा हा विजय असल्याचे म्हटले आहे.
राज्यातील जिल्हा परिषदांच्या निवडणुकीत सर्वाधिक २३६ सदस्य भारतीय जनता पक्षाचे निवडून आले आहेत. अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे १७२ सदस्य निवडून आले आहेत. त्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे १६२ तर काँग्रेसचे ५५ सदस्य निवडून आले आहेत.
बारामती मध्ये अजित दादांच्या निधनानंतरची सहानुभूतीच्या लाटेने घड्याळाची टिकटिक कायम ठेवलेली आहे.

## शरद पवार यांची प्रकृती चिंताजनक

### पुण्यातील रुग्णालयात हलवले

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ९ :**



राष्ट्रवादी काँग्रेसचे (एसपी) सर्वेसर्वा शरद पवार यांची प्रकृती अचानक बिघडल्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.
८५ वर्षीय पवार हे बारामतीतील त्यांच्या निवासस्थानी असताना त्यांना तीव्र अस्वस्थता जाणवू लागली. त्यांच्या वाढत्या वयाचा विचार करून स्थानिक डॉक्टरांनी त्यांना तातडीने पुण्यातील 'रुबी हॉल क्लिनिक'मध्ये हलवण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार करण्यात येणार असून, प्रकृती स्थिर करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.
या प्रवासादरम्यान खासदार सुप्रिया सुळे या शरद पवार यांच्यासोबत असून खबरदारीचा उपाय म्हणून त्यांच्या ताफ्यात सुसज्ज रुग्णवाहिकेचाही समावेश करण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वीच अजित पवार यांच्या निधनामुळे पवार कुटुंब दुःखात असतानाच, आता शरद पवार यांच्या प्रकृतीबाबतच्या बातमीने कार्यकर्त्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.
अद्याप रुग्णालयाकडून अधिकृत आरोग्य अहवाल प्रसिद्ध करण्यात आला नसला तरी, शरद पवार लवकर बरे व्हावेत यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून प्रार्थना केली जात आहे.

## विरोधकांमध्ये लढण्याच्या इच्छाशक्तीचा अभाव

### फडणवीसांचा टोला

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ९ :**
जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे निकाल समोर येण्यास सुरुवात झाली असून महायुती आणि विशेषतः भाजपला बहुतांश ठिकाणी चांगल्या जागा मिळाल्या आहेत. या निवडणुकीत देखील महायुतीचे वर्चस्व पाहायला मिळाले आहे. तर पुण्यात अजित पवारांच्या राष्ट्रवादीला घवघवीत यश मिळाले आहे. या निवडणुकांच्या निकालांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.
देवेंद्र फडणवीस म्हणाले, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे निकाल हाती येत आहेत. आतापर्यंत हाती आलेले निकाल आणि अंतिम टप्प्यातले कल पाहता महाराष्ट्रातील जनतेने पुन्हा एकदा महायुतीवर विश्वास दाखवला असल्याचे दिसत आहे. १२ जिल्हा परिषदांमध्ये भारतीय जनता पार्टी पुन्हा एकदा सर्वात मोठा पक्ष म्हणून स्थापित झाला आहे. या सगळ्या जिल्हा परिषदांमध्ये महायुतीचीच सत्ता येणार असल्याचे स्पष्ट आहे.
फडणवीस म्हणाले, साधारण आपण बघितले तर जवळपास ६० ठिकाणी भाजप नंबर एकवर आहे. छत्रपती संभाजीनगर, सिंधुदुर्ग, सोलापूर, सांगली, धाराशिव, परभणी आणि सातारा. रत्नागिरी आणि रायगड या दोन ठिकाणीशिवसेना नंबर एकवर आहे, राष्ट्रवादी काँग्रेस पुण्यात नंबर एकवर आहे.
जिथे तीनही पक्ष एकत्रित लढलो अशा कोल्हापूर आणि लातूरमध्ये देखील आम्हीच नंबर एकवर आहोत. त्यामुळे मला असे वाटते की अतिशय चांगला हा कल समोर आलेला आहे. भाजपसाठी देखील आपला २०१७ चा रेकॉर्ड तोडला आहे.



२०१७ साली भाजपला जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत १४१ जागा होत्या. आता अजून निकाल पूर्ण व्हायचे आहेत, पण घोषित झालेल्या निकालात २३६ जागा भाजपला मिळाल्या आहेत.
फडणवीस म्हणाले, या निवडणुकांच्या दरम्यान, आमचे महायुतीमधील वरिष्ठ नेते अजितदादा पवार यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्याचे दुःख आमच्या सर्वांना आहे. त्यामुळे मी निर्णय घेतला होता की मी प्रचार करणार नाही. त्यामुळे मी फक्त आवाहनाचा व्हिडिओ केला होता.
फडणवीस म्हणाले, आम्ही या विचारांचे आहोत की कोणीही पर्मनन्ट जिंकत नसते आणि कोणीही पर्मनन्ट हारत नसते. पण जे लोक आपल्या पराभवाचे कारणे शोधण्याच्या ऐवजी कोणावर तरी खापर फोडतात ते मात्र कधीच जिंकू शकत नाहीत, असा टोला त्यांनी विरोधकांना लगावला आहे.
महाविकास आघाडी फारशी कुठे दिसत नाही. रोज सकाळी त्यांचे प्रवक्ते जे बोलतात, त्याने आम्हाला फायदाच होतो. त्यामुळे आम्हाला फारसे काही करायची गरजच पडत नसल्याचेही ते म्हणाले.

## तुम्ही बोलू द्याल का?

### विरोधक आणू शकतात अध्यक्षांविरोधात अविश्वास प्रस्ताव

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ९ :**
अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या नवव्या दिवशी लोकसभेचे कामकाज केवळ १३ मिनिटेच चालले. विरोधक सभागृहात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना बोलू देण्याची मागणी करत होते.
राहुल गांधी यांनी लोकसभेत सांगितले की, एक तासापूर्वी आम्ही अध्यक्षांकडे गेलो होतो, अध्यक्षांनी आम्हाला अर्थसंकल्पावरील चर्चेपूर्वी बोलू देण्याचे आश्वासन दिले होते, पण तुम्ही मला बोलू देत नाही आहात. मी तुम्हाला विचारू इच्छितो की तुम्ही मला बोलू देणार आहात की नाही.
दुपारी ३ वाजता सभागृहाचे कामकाज सुरू झाल्यावर आसंदीवर (अध्यक्षांच्या खुर्चीवर) संध्या राय (भाजप खासदार) बसल्या होत्या. राहुल यांच्या बोलण्याला उत्तर देताना संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू म्हणाले की, मी देखील अध्यक्षांच्या केबिनमध्ये उपस्थित होतो. असे कोणतेही आश्वासन दिले नव्हते.
संध्या यांनी राहुल यांना सांगितले की, तुमच्याकडून इतर कोणत्याही मुद्द्यासाठी कोणतीही सूचना आलेली नाही, अर्थसंकल्पावर चर्चा करायची असेल तर सांगा. यानंतर विरोधकांनी गोंधळ घातला. यानंतर लोकसभेचे कामकाज मंगळवारी सकाळी ११ वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले.



त्याचबरोबर, विरोधक लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव आणू शकतात. हा प्रस्ताव मांडण्यासाठी किमान ५० खासदारांचे समर्थन आवश्यक असते. यासाठी सभागृहात १४ दिवसांपूर्वी लेखी नोटीस द्यावी लागते.
दुसरीकडे, काँग्रेसच्या महिला खासदारांनी लोकसभा अध्यक्षांना पत्र लिहिले आहे. आम्ही हे पत्र अत्यंत दुःख आणि घटनात्मक जबाबदारीच्या खोल भावनेने लिहित आहोत. हे अत्यंत दुर्दैवी आहे की आपण, लोकसभेचे अध्यक्ष आणि या सन्माननीय सभागृहाचे घटनात्मक संरक्षक असूनही, सत्ताधारी पक्षाकडून विरोधी पक्षाच्या महिला खासदारांविरुद्ध, विशेषतः काँग्रेसच्या महिला खासदारांविरुद्ध, खोटे, निराधार आणि बदनामीकारक आरोप लावण्यासाठी भाग पाडले गेले आहात, असे पत्रात नमूद आहे.

## दहशतवादी अब्दुल रहमानची तुरुंगात निर्घृण हत्या

■ **वृत्तसंस्था, फरीदाबाद, दि. ९ :**
हरियाणातील फरिदाबाद कारागृहात बंद दहशतवादी अब्दुल रहमान याची हत्या करण्यात आली आहे. कारागृहात खून प्रकरणात बंद असलेल्या अरुण चौधरी उर्फ अब्बू जट नावाच्या कैद्याने त्याच्यावर धारदार वस्तूने हल्ला केला. दोघांनाही उच्च सुरक्षा असलेल्या बराकमध्ये एकत्र ठेवण्यात आले होते.
हत्येची माहिती मिळताच कारागृह अधिकारी बराकमध्ये पोहोचले. त्यानंतर दहशतवाद्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. 20 वर्षीय दहशतवादी अब्दुलला गुजरात एटीएसने मार्च 2025 मध्ये पकडले होते.

## बारावी परीक्षेसाठी राज्यात १५.३२ लाख विद्यार्थी नोंदणी

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ९ :**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बारावीच्या (उच्च माध्यमिक प्रमाणपत्र) परीक्षेसाठी यंदा १५ लाख ३२ हजार ४७८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. ही परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान राज्यातील ३ हजार ३८७ मुख्य केंद्रांवर घेतली जाईल.
नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये ८ लाख २० हजार २२९ मुले, ७ लाख १२ हजार २४० मुली आणि १८ तृतीयपंथी विद्यार्थ्यांचा समावेश आहे. एकूण १० हजार ६६४ कनिष्ठ महाविद्यालयांमधून या विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.नऊ विभागीय मंडळांमार्फत परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे.

## मतांमधून वाहिली दादांना श्रद्धांजली

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ९ :**



जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला मिळालेले यश, हे केवळ राजकीय यश नसून ते दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जनसेवेला आणि विकासात्मक दृष्टीला जनतेने दिलेली एक मोठी आदरांजली आहे, अशा शब्दांत राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. अजितदादांच्या अकाली एक्झिटनंतर पक्षाच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्यांना या निकालांनी चोख उत्तर दिले असल्याचे तटकरे यांनी म्हटले आहे.
सुनील तटकरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत म्हटले की, अजितदादांनी आपल्या राजकीय आयुष्यात नेहमीच तळागाळातील लोकांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. विकासाचा वेग कसा वाढवता येईल, यासाठी त्यांनी अहोरात्र कष्ट उपसले. आजचा हा निकाल म्हणजे त्यांच्या कामावर जनतेने ठेवलेल्या अढळ विश्वासाची साक्ष आहे. मतदारांनी दादांच्या कार्याचा गौरव केला आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.
अजितदादांच्या पश्चात ही पहिलीच मोठी परीक्षा पक्षासमोर होती. या यशाने कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य निर्माण झाले असून, विस्कळीत होऊ पाहणाऱ्या फळीला पुन्हा एकदा संजिवनी मिळाली आहे, असेही तटकरे यांनी पुढे स्पष्ट केले.

## तपासणी व उपचार पूर्वीप्रमाणे निःशुल्क

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय रुग्णालयामधील तपासणी व उपचार हे शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाच्या २३ ऑगस्ट २०२३ च्या शासन निर्णयान्वये अन्वये निःशुल्क करण्यात आलेले असून ते पूर्वीप्रमाणेच निःशुल्क आहेत.
सार्वजनिक आरोग्य विभागाने १६ जानेवारी रोजी प्रसिद्ध केलेल्या नागरिकांच्या सनदेमधील परिशिष्ट-तीन मध्ये सेवा सुविधा पुरविण्यासाठी शासन मान्य दर अनवधानाने समाविष्ठ झाले. प्रत्यक्षात सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखाली शासकीय रुग्णालयामध्ये तपासणी व उपचार निःशुल्क करण्यात आलेले असल्याने नागरिकांच्या सनदेमधील परीशिष्ठ-तीन हे ९ फेब्रुवारी २०२६ शुध्दीपत्रकान्वये वगळण्यात आले आहे. अशी माहिती सार्वजनिक आरोग्य विभागाने दिली आहे.

## ईपीएफओ लाँच करणार मार्च-एप्रिलमध्ये नवीन मोबाइल ॲप



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ९ :**
कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनाचे सदस्य आता लवकरच नवीन मोबाईल ॲपद्वारे युपीआयद्वारे पीएफचे पैसे काढू शकतील. मनीकंट्रोलच्या अहवालानुसार, ईपीएफओ हे ॲप मार्च-एप्रिल २०२६मध्ये लॉन्च करू शकते. सध्या याची चाचणी सुरू आहे आणि तांत्रिक त्रुटी दूर केल्या जात आहेत.
नवीन ईपीएफओ ॲप, उमंग ॲपपेक्षा वेगळे असेल. हे ॲप सदस्याच्या बँक खात्याशी लिंक केलेले असेल. याव्यतिरिक्त, ते भीम ॲप आणि इतर युपीआय ॲप्सशी देखील लिंक असेल. त्यामुळे सदस्यांना पीएफचे पैसे युपीआय द्वारे थेट बँक खात्यात हस्तांतरित करण्याची सुविधा मिळेल.
यासाठी सदस्यांना ॲपमध्ये लॉगिन करावे लागेल. जिथे सदस्य त्यांची पात्र ईपीएफ शिल्लक पाहू शकतील. नंतर युपीआय पिन टाकून व्यवहार पूर्ण करू शकतील. पैसे थेट सीडेड बँक खात्यात जमा होतील. पासबुक शिल्लक तपासण्यासारख्या इतर सेवा देखील ॲपमध्ये उपलब्ध असतील.

## राज्यात ७० हजार पदांची लवकरच नोकरभरती

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
मुंबई, दि ९ : राज्यात लवकरच नोकर भरती प्रक्रिया नव्या पद्धतीने राबवली जाणार आहे. जवळपास ७० हजारांहून अधिक पदांची भरती टप्प्याटप्प्याने केली जाणार आहे. यामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सुमारे २० हजार पदे आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाबाहेरील पदांचा समावेश असणार आहे.
भरती प्रक्रिया राबविताना आवश्यक कौशल्ये, सेवा प्रवेश, पात्रता आणि कामाच्या स्वरूपानुसार निर्णय घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.
मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे सेवा प्रवेश नियमावली सुधारणेसंदर्भात बैठक झाली. या बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह प्रशासनातील सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव तसेच सचिव उपस्थित होते.




राज्य प्रशासनातील महत्त्वाच्या विभागांकडे सर्वांगीण प्रशासन सुधारणा वेगाने राबवाव्यात याव्यात. मनुष्यबळ व्यवस्थापन आणि भरती प्रक्रियेतील पारदर्शकता याला प्राधान्य असेल. राज्य शासनाच्या सेवा प्रवेश नियमावली सुधारणे संदर्भातील निर्णय लवकरच मंत्रिमंडळ बैठकीत घेतला जाणार असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.
सामान्य प्रशासन विभाग हा केवळ औपचारिक नाही, तर शासनाच्या संपूर्ण भरती प्रणालीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. राज्य शासनाच्या विविध विभागात ७० हजार पदे भरल्यानंतर विभागाच्या कार्यक्षमतेत भर पडणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या परिषदेत महाराष्ट्र शासनाने मांडलेले मनुष्यबळ व्यवस्थापन मॉडेल सर्वाधिक प्रशंसनीय ठरल्याचे त्यांनी सांगितले.

# प्रशासकीय सुधारणांचा जीपीआर २.० उपक्रम

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
राज्यातील प्रशासकीय कामकाजात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्यासाठी शासनाने जीपीआर २.० हा महत्त्वाकांक्षी प्रशासकीय सुधारणा उपक्रम हाती घेतला आहे. महाराष्ट्राच्या या अभिनव उपक्रमाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विशेष कौतुक करत देशातील इतर राज्यांनाही याच धर्तीवर कार्य करण्याच्या सूचना दिल्या आहेत.
या प्रशासकीय सुधारणांचा प्रत्यक्ष लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी समन्वयाने व प्रभावीपणे काम करावे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.
सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय सुधारणांबाबत आढावा बैठक पार पडली. या बैठकीस राज्यमंत्री डॉ. पंकज भोईर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह सर्व



विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव उपस्थित होते. सामान्य प्रशासन विभागामार्फत जीपीआर २.० उपक्रमाच्या टप्पा एक व टप्पा दोनबाबत सादरीकरण करण्यात आले.
मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जीपीआर २.० च्या माध्यमातून प्रशासकीय सुधारणांची तर्कशुद्ध व एकात्मिक स्वरूपात अंमलबजावणी करण्यात येत आहे. या उपक्रमाचा पहिला टप्पा यशस्वीरित्या पूर्ण झाला असून सर्व विभागांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. दुसरा टप्पा १ मे २०२६ पर्यंत पूर्ण होणार असून या सुधारणा अंमलात आल्यानंतर नागरिकांना प्रशासकीय सेवा अधिक सुलभ, जलद व पारदर्शक पद्धतीने मिळतील यासाठी सर्वंकष काम करण्याची आवश्यकता आहे.
मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्याच्या प्रशासकीय सेवा, यंत्रणा विकास, पायाभूत सुविधा तसेच साधनसामग्री यांना भविष्याभिमुख दृष्टीने सक्षम व सुदृढ करणे अत्यावश्यक आहे. जीपीआर २.० च्या माध्यमातून या दिशेने ऐतिहासिक कार्य होत आहे. आगामी पाच ते दहा वर्षे या बदलांसाठी निर्णायक ठरेल.

**जीपीआर २.० उपक्रमाची वैशिष्ट्ये**

केंद्रित सक्षमीकरणाच्या कालबद्ध अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्री कार्यालय, माहिती व तंत्रज्ञान विभाग तसेच राज्य माहिती आयुक्त कार्यालयामार्फत देखरेख.

नागरिकांना प्रशासकीय सेवा सहज, सुलभ व सुव्यवस्थित पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी सक्षम प्रणालीची उभारणी.

नागरिकांना सोप्या व दर्जेदार सेवा मिळाव्यात यासाठी नागरिकांची सनद निश्चित करणे.

# बीएमसीत ठरला सत्तेचा फॉर्म्युला

## स्थायीसह शिक्षण समिती भाजपकडे : सुधार आणि 'बेस्ट' समिती शिंदेंच्या सेनेला

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :
मुंबई महानगरपालिकेत भाजप आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने सत्ता स्थापन केल्यानंतर आता प्रशासकीय कारभारातील महत्त्वाच्या समित्यांचे वाटप मार्गी लागले आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पालिकेच्या आर्थिक नाड्या ज्या समितीच्या हातात असतात, ती अत्यंत महत्त्वाची स्थायी समिती भाजपने स्वतःकडे ठेवली आहे. यामुळे मुंबईच्या विकासकामांच्या निधीवर भाजपचे थेट नियंत्रण राहणार आहे. तर, सुधार समिती आणि बेस्ट समिती एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला देण्यावर दोन्ही पक्षांत एकमत झाले आहे. आगामी २० फेब्रुवारीपर्यंत या मुख्य समित्यांचे वाटप पूर्ण होईल, तर त्यानंतरच्या दोन ते तीन आठवड्यांत प्रभाग समित्यांची प्रक्रिया पार पडेल.



महानगरपालिकेच्या तिजोरीची सूत्रे स्थायी समितीच्या अध्यक्षाच्या हातात असतात. विकासकामांच्या निधीचे वाटप आणि महत्त्वाच्या निविदांना मंजुरी देण्याचे अधिकार या समितीला असल्याने, हे पद महापौरपदाच्या तोडीस तोड मानले जाते. शिंदे सेनेने या समितीसाठी आग्रह धरला होता, मात्र भाजपने ही समिती स्वतःकडे ठेवून मुंबईच्या कारभाराची मुख्य सूत्रे आपल्या हातात ठेवली आहेत.

गेल्याच आठवड्यात भाजपच्या रितू तावडे यांची महापौरपदी, तर शिवसेनेचे (शिंदे गट) संजय घाडी यांची उपमहापौरपदी निवड झाली आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने 'मराठी महापौर' ही मागणी लावून धरली होती. भाजपने रितू तावडे यांच्या रूपाने मराठी चेहरा समोर केल्यामुळे ठाकरे गटाला विरोधाची धार कमी करावी लागली आणि तावडे यांची निवड बिनविरोध झाली.

गुजराती बहुल असलेल्या घाटकोपरमधून निवडून आलेल्या रितू तावडे यांच्या निवडीमुळे भाजपने मराठी आणि अमराठी मतदारांमध्ये समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे. संजय घाडी यांची नियुक्ती सव्वा वर्षासाठी करण्यात आली असून, त्यानंतर शिंदे गटातील दुसऱ्या नगरसेवकाला ही संधी दिली जाईल.

दरम्यान, महापौरपद आणि स्थायी समिती स्वतःकडे ठेवून भाजपने मुंबई महानगरपालिकेच्या कारभाराची मुख्य सूत्रे आपल्या हातात घेतली आहेत. मुंबईच्या सत्तेत भाजप आता 'मोठ्या भावाच्या' भूमिकेत असून, आगामी काळात समित्यांच्या माध्यमातून विकासकामांचा वेग वाढवण्याचे आव्हान या युतीसमोर असणार आहे.

## यशाचे श्रेय विकासकामांना



■ **मुंबई** : महाराष्ट्रातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीचे निकाल समोर येत असताना भाजपने मोठी मुसंडी मारली आहे. भाजपने अनेक जिल्ह्यांमध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले असून, या यशाचे श्रेय भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीला आणि विकासकामांना दिले आहे. ज्या पद्धतीने देवेंद्रजींनी शहरांबरोबरच ग्रामीण विकासासाठी योजना राबवल्या, त्याचेच पडसाद आजच्या निकालातून उमटत आहेत, असे दरेकर यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

दरेकर म्हणाले, भारतीय जनता पार्टीच्या मागोमाग शिंदे सेनेला यश मिळाले. आमचा मित्रपक्ष अजित पवारांची राष्ट्रवादी सुनेत्रा वहिनींच्या नेतृत्वाखाली त्यांना यश मिळताना दिसते. बाकी संमिश्र यश आहे. पण ओव्हरऑल महाराष्ट्रात आम्ही एकमेकांच्या विरोधात लढलो तरी, महायुतीलाच जनाधार मिळताना दिसतोय.

बाळासाहेबांची हिंदुत्वाची मूळ भूमिका सोडल्यामुळे ठाकरे गटाचे शहरांमध्ये मोठे नुकसान झाले आहे. ग्रामीण भागात संघटना टिकवण्यात आणि वाढवण्यात ठाकरेंना अपयश आले आहे. निवडणुका या कार्यकर्त्यांचे मनोबल वाढवण्यासाठी असतात, पण ठाकरेंकडून तसे प्रयत्न झाले नाहीत. ठाकरे गटाकडून ना मोठ्या प्रचारसभा झाल्या, ना कार्यकर्त्यांना ताकद दिली गेली. पक्ष पातळीवर आत्मविश्वास वाढवण्याचे कोणतेही कार्य न झाल्याने कार्यकर्त्यांनी त्यांचा हात सोडला आहे, असा टोला दरेकरांनी लगावला.

## अजितदादांच्या निधनामुळे जल्लोष टाळला..

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या निकालांचे कल स्पष्ट होताच महायुतीमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे या विजयाचा कोणताही जल्लोष न करण्याचा निर्णय भाजपने घेतला आहे.



देवेंद्र फडणवीस यांनी अजितदादांच्या निधनानंतर सर्व कार्यकर्त्यांना मिरवणुका आणि मोठे सोहळे टाळण्याच्या सूचना दिल्या होत्या, अशी माहिती भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आज दिली. फडणवीस यांच्या संवेदनशील नेतृत्वामुळेच कार्यकर्त्यांनी ही निवडणूक केवळ संघटनात्मक पातळीवर आणि 'बूथ' स्तरावर लढवली, असेही त्यांनी नमूद केले.

रवींद्र चव्हाण यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक करताना सांगितले की, फडणवीस प्रत्येक निवडणुकीसाठी अहोरात्र कष्ट घेतात. अजितदादांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी कार्यकर्त्यांना आदेश दिले होते की, मोठ्या प्रचारसभा किंवा शक्तीप्रदर्शन करू नका. ही निवडणूक शांततेत आणि संघटनात्मकदृष्ट्या सूक्ष्म स्तरावर लढा. त्यांच्या या संवेदनशील निर्णयाचा आम्ही सर्वांनी आदर केला आणि निकालांनी हे सिद्ध केले की जनतेला आमची कार्यपद्धती मान्य आहे.

या विजयाचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ११ वर्षांच्या कारकिर्दीला देताना रवींद्र चव्हाण म्हणाले की, गेल्या ११ वर्षांत मोदींनी शेतकरी, कष्टकरी आणि शहरी तसेच ग्रामीण भागातील प्रत्येक वर्गाच्या जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी अनेक योजना राबवल्या. महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दिवंगत अजित पवार यांनी गेल्या तीन वर्षांत ज्या ताकदीने काम केले, त्याचीच ही फलश्रुती आहे.

## नट-नट्या आणि गुन्हेगार हीच का संघाची प्रेरणा?



■ **मुंबई** : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने मुंबईत आयोजित सोहळ्यात दिसलेले चित्र पाहून संघाच्या राष्ट्रभक्तीचा धक्का बसला अशा शब्दांत खासदार संजय राऊत यांनी आपला संताप व्यक्त केला आहे. ज्यांच्या बापाने भारतावर बॉम्ब टाकले, ते आज सरसंघचालकांसोबत चहा पित आहेत, असे म्हणत राऊतांनी अदनान सामीच्या उपस्थितीवरून थेट 'हिंदुत्वा'च्या मुद्द्याला हात घातला आहे.

भारतावर हल्ला करणाऱ्यांचे वंशज जर संघाच्या व्यासपीठावर सन्मानित होत असतील, तर तुम्ही देशाला नेमकी कोणती प्रेरणा देत आहात? असा सवाल त्यांनी केला. एक नटी म्हणते 'आय लव्ह भागवत', पण तिच्यावर आर्थिक अफरातफरीची लुकआऊट नोटीस आहे. तिच्या पतीवर लहान मुलांच्या पॉर्न फिल्म्स बनवल्याचा आरोप आहे. बँका बुडवणारे आणि व्याभिचारी लोक जर व्यासपीठावर असतील, तर संघाचे चारित्र्य किती बिघडले आहे, हे सरसंघचालकांना माहीत नसेल का? असा सवाल त्यांनी केला.

सरसंघचालक मोहन भागवत यांनी 'संघामुळे भाजपला अच्छे दिन आले' असे विधान केले होते. त्यावर संजय राऊत म्हणाले, संघामुळे भाजपला अच्छे दिन आले, असे सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले होते. यावरही संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली. संघामुळे भाजपला अच्छे दिन आले, पण देशाला अच्छे दिन आलेले नाहीत. भाजपमुळे देशातील अच्छे दिन निघून गेले. याला जबाबदार संघ आहे, असे संजय राऊत म्हणाले.

## शाळेत जाणाऱ्या चिमुरडीवर १०-१५ कुत्र्यांचा हल्ला

■ **मुंबई** : डोंबिवलीजवळील खोणी पलावा परिसरातील ऑर्किड सोसायटीमध्ये आज (सोमवार, ९ फेब्रुवारी) सकाळी काळजाचा ठोका चुकवणारी घटना घडली. नेहमीप्रमाणे शाळेत जाण्यासाठी घराबाहेर पडलेल्या एका ७ वर्षांच्या चिमुरडीवर चक्क १० ते १५ भटक्या कुत्र्यांच्या कळपाने जीवघेणा हल्ला केला. सोसायटीच्या सुरक्षारक्षकाने वेळेत धाव घेतल्यामुळे या मुलीचे प्राण वाचले.

आज सकाळी ७:३० ते ८ च्या सुमारास ही घटना घडली. ती ७ वर्षांची मुलगी आपल्या शाळेच्या बससाठी सोसायटीच्या आवारातून जात होती. यावेळी तिथे कळपाने बसलेल्या कुत्र्यांच्या नजरेत ही मुलगी पडली आणि क्षणात १० ते १५ कुत्रे तिच्या दिशेने धावून आले. कुत्र्यांचा कळप अंगावर येताच मुलगी प्रचंड घाबरली आणि बचावासाठी पळू लागली. यामुळे कुत्रे अधिकच आक्रमक झाले आणि त्यांनी तिचा पाठलाग करून तिला वेढले. मुलीचा किंचाळण्याचा आवाज ऐकताच परिसरात तैनात असलेल्या सुरक्षारक्षकाने क्षणाचाही विलंब न लावता हातात लाठी घेऊन त्या दिशेने धाव घेतली. त्याने लाठी फिरवून आणि कुत्र्यांवर ओरडून त्यांना हुसकावून लावले.

## उद्धव ठाकरे पुन्हा विधान परिषदेवर जाणार का?



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ९ :**
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या विधान परिषद सदस्यत्वाचा कार्यकाळ मे महिन्यात संपुष्टात येत आहे. यामुळे ते पुन्हा विधान परिषदेवर जाणार? की पक्षातील इतर नेत्याला संधी देणार? याविषयी राज्याच्या राजकारणात वेगवेगळ्या अटकळी व्यक्त केल्या जात असताना सत्ताधारी शिंदे गटाचे मंत्री उदय सामंत यांनी ठाकरेंवर निशाणा साधला आहे. सत्ताधारी महायुतीकडे मोठे संख्याबळ असल्यामुळे विरोधकांकडून कोणतेही धाडस होणार नाही, असे उद्धव ठाकरे यांचा चिमटा काढताना म्हणालेत.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे नेते तथा राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज विधान परिषदेच्या आगामी निवडणुकीवर भाष्य करताना संख्याबळाचा मुद्दा पुढे केला. विधान परिषदेच्या निवडणुका या मुख्यत्वे आमदारांच्या संख्याबळावर ठरतात, असे सांगत त्यांनी सध्याच्या राजकीय गणितावर भाष्य केले. आमच्याकडे मोठे संख्याबळ असल्यामुळे विरोधकांकडून कोणतेही धाडस होणार नाही, असे ते म्हणाले.

विधानसभेतील सध्याच्या अंकगणिताचा विचार केला तर सध्या सत्ताधारी महायुतीकडे स्पष्ट बहुमत आहे. त्यामुळे विधान परिषद निवडणुकीतही त्यांना वरचष्मा राहण्याची शक्यता राजकीय विश्लेषक व्यक्त करत आहेत. महायुतीकडे तब्बल २३५ आमदारांचे संख्याबळ असल्याचा दावा सत्ताधारी नेत्यांकडून केला जातो, तर महाविकास आघाडीच्या ताफ्यात तुलनेने कमी आमदार आहेत. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी पुन्हा विधान परिषदेत प्रवेश करायचा असल्यास केवळ स्वतःच्या पक्षाच्या मतांवर अवलंबून राहणे कठीण ठरू शकते, अशी चर्चा सुरू आहे.

महाविकास आघाडीतील ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि काँग्रेस या पक्षांमधील राजकीय समीकरणेही या निवडणुकीत निर्णायक ठरू शकतात. मविआकडे एकूण ४८ आमदार आहेत. त्यात उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे २० आमदार आहेत. त्यामुळे विधान परिषदेसाठी आवश्यक मतांची जुळवाजुळव करण्यासाठी ठाकरेंना आघाडीतील घटक पक्षांशी समन्वय साधावा लागेल, असे संकेत दिले जात आहेत.

दुसरीकडे, उद्धव ठाकरे स्वतः विधान परिषदेवर जाण्याचा निर्णय घेतात की पक्षातील नव्या चेहऱ्याला संधी देतात, हा देखील महत्त्वाचा प्रश्न ठरणार आहे. पक्ष संघटन मजबूत करण्याच्या दृष्टीने नवीन नेतृत्व पुढे आणण्याचा पर्यायही त्यांच्या समोर असल्याची चर्चा आहे. मात्र ठाकरे यांनी अद्याप या संदर्भात कोणतीही अधिकृत भूमिका स्पष्ट केलेली नाही.

राज्याच्या राजकारणात गेल्या काही वर्षांत झालेल्या बदलांमुळे विधान परिषद निवडणुकीचे राजकीय महत्त्व वाढले आहे. संख्याबळाचे गणित आणि आघाड्यांमधील अंतर्गत समन्वय यामुळे आगामी निवडणूक अधिकच रंगतदार होण्याची शक्यता आहे. विधान परिषद निवडणुकीत क्रॉस वोटिंग किंवा राजकीय तडजोडींची शक्यता कायम चर्चेत असते. त्यामुळे अंतिम निकालापूर्वी अनेक राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## झेडपी निवडणुकीत दिग्गजांच्या वारसांनी मारली बाजी!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीचे निकाल आज जाहीर झाला. या निवडणुकीत सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे प्रस्थापित राजकीय नेत्यांच्या नातेवाईकांनी मिळवलेले घवघवीत यश. आपल्या कुटुंबाचा राजकीय वारसा पुढे नेत या वारसांनी विरोधकांना धूळ चारली असून, अनेक मतदारसंघांमध्ये घराणेशाहीचा प्रभाव पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

पुणे जिल्ह्यात महायुती आणि महाविकास आघाडीत काँटे की टक्कर असताना, दिग्गज नेत्यांच्या नातेवाईकांनी आपली जागा सुरक्षित केली आहे. आंबेगाव मतदारसंघात माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या प्रतिष्ठेच्या लढतीत त्यांचे पुतणे विवेक वळसे पाटील यांनी पारगाव गटातून विजय निश्चित केला.

पुरंदर तालुक्यात माजी आमदार बापूसाहेब पठारे यांची कन्या रूपाली झेंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या चिन्हावर विजय मिळवला. विशेष म्हणजे, पुरंदरमधील दोन्ही पंचायत समिती सदस्यही राष्ट्रवादीचेच निवडून आले.

सोलापूर जिल्ह्यातमाढा तालुक्यातील मानेगाव गटातून माजी मंत्री तानाजी सावंत यांचे पुतणे पृथ्वीराज सावंत यांनी भाजपच्या तिकिटावर विक्रमी मताधिक्याने प्रतिस्पर्ध्याचा धुव्वा उडवला. भाजप नेते राम सातपुते यांच्या पत्नी संस्कृती सातपुते यांनीही दहिगाव गटातून विजय मिळवत राजकीय क्षेत्रात यशस्वी एन्ट्री केली आहे. कोकणातील राजकीय बालेकिल्ल्यांमध्येही नेत्यांच्या मुलांनी आपला प्रभाव कायम ठेवला आहे. रत्नागिरीच्या गुहागरमध्ये आमदार भास्कर जाधव यांचे चिरंजीव विक्रांत जाधव यांनी विजय संपादन केला.

## एकेकाळी नटांना नाच्या म्हणणारे आज त्यांनाच कार्यक्रमात बोलवतायेत...

### प्रकाश आंबेडकरांची संघावर टीका



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी पत्रकार परिषद घेत सरसंघ चालक मोहन भागवत तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टीका केली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमात अभिनेता सलमान खान उपस्थित होता. यावरून देखील आंबेडकरांनी संघावर टीकेची झोड उठवली आहे.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, मोहन भागवत यांनी मुंबईत बॉलीवूड मधील लोकांसमोर भाषण दिले. आरएसएसने एकेकाळी ह्या सर्व सांस्कृतिक कलेचा निषेध केला होता, शिव्या दिल्या होत्या. नटांना नाच्या म्हणून त्यांनी संबोधले होते.

सिनेमातील जे सेलिब्रिटी आहेत, त्यांना त्यांच्या कामामुळे समाजात मान्यता आहे, त्याचा फायदा घेण्यासाठी आरएसएसने हे काम सुरू केले आहे. हे आरएसएसचे नवीन चारित्र्य असल्याची टीका आंबेडकरांनी केली आहे.

तसेच आरएसएसचे गोळवलकर यांनी बंच ऑफ थॉट्स या पुस्तकात आरएसएससाठी सांस्कृतिक रोड मॅप दिला होता, त्याचा मोहन भागवत निषेध करतायत का? याचा खुलासा त्यांनी करावा, असेही आंबेडकर म्हणाले.

विनायक दामोदर सावरकर यांना भारतरत्न देण्याची मागणी सध्या सुरू आहे. यावर बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, दुर्दैवाने मोहन भागवत यांनी सावरकर यांच्यावरचा माझा लेख त्यांनी वाचला नसेल. सावरकरांचे दोन चेहरे आहेत. एक क्रांतिकारी सावरकर आणि एक ब्रिटीशांना मदत करणारे सावरकर. जेलमध्ये जाण्याच्या आधी ते क्रांतिवीर होते, हे सर्वांनीच मान्य केले पाहिजे.

पण जेलमधून बाहेर आल्यानंतर त्यांची संघटना जी होती हिंदू महासभा, या संघटनेने पत्री सरकारच्या लढवय्याना ब्रिटीशांना पकडून देण्याचे काम केले आहे.

**सावरकरांनी ब्रिटिशांना मदत केली**

प्रकाश आंबेडकर म्हणाले, महाराष्ट्रात महाराष्ट्रामध्ये ब्रिटिशांविरोधात पत्री सरकार लढत होते, तेव्हा त्या लढवय्यांना ब्रिटिशांना पकडून देण्याचे काम हिंदू महासभा करत होती.

सातारा, सांगली, कोल्हापूरमधील पत्री सरकारमधील अनेकांना त्यांनी पकडून दिले होते. तेव्हा हिंदू महासभेच्या एका व्यक्तीने सांगितले होते की, हे काम आम्ही आमच्या प्रमुखाच्या म्हणजेच विनायक सावरकर यांच्या सांगण्यावरून करतोय. सावरकरांनी ब्रिटिशांना मदत केली होती. त्यामुळे अशा व्यक्तीला भारतरत्न द्यावा, असे मी मानत नाही, असे मत आंबेडकरांनी व्यक्त केले आहे.

## परभणीकरांनी नाकारली घराणेशाही

### वरपुडकर कुटुंबातील ५ पैकी ४ उमेदवारांचा पराभव

■ **वृत्तसंस्था, परभणी, दि. ९ :**
जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत अनेक ठिकाणी मतदारांनी राजकारण्यांची थोपली जाणारी घराणेशाही नाकारली आहे.

परभणी जिल्ह्यातील निवडणुकीत मतदारांनी भाजप नेते तथा माजी मंत्री सुरेश वरपुडकर यांच्या कुटुंबातील ५ पैकी ४ उमेदवारांचा पराभव करून वरपुडकरांना जोरदार झटका दिला आहे. या निवडणुकीत वरपुडकर यांच्या केवळ एका पुतण्याचा विजय झाला आहे. त्यांनी काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढवली होती.

माहितीनुसार, सुरेश वरपुडकर यांच्या कन्या सोनल देशमुख ह्या झरी जिल्हा परिषद गटातून उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या होत्या. त्यांचा भजाप उमेदवार दिलीप देशमुख यांनी पराभव केला. वरपुडकरांचे चिरंजीव समशेर वरपुडकर हे शिंगणापूर जिल्हा परिषद गटातून उभे होते. त्यांचाही ठाकरे गटाच्या पांडुरंग खिल्लारे यांनी पराभव केला.

सुरेश वरपुडकर यांच्या स्नुषा प्रेरणा वरपुडकर या ही दैठणा जिल्हा परिषद गटातून निवडणुकीच्या मैदानात उतरल्या होत्या. त्यांचा काँग्रेस उमेदवार ज्योत्स्ना गणेश घाडगे यांनी पराभव केला. दुसरीकडे, लोहगाव जिल्हा परिषद गटात सुरेश वरपुडकरांचे २ पुतणे निवडणूक लढवत होते. त्यातील काँग्रेसच्या तिकिटावर उभ्या राहिलेल्या अजित वरपुडकर यांचा विजय झाला. यामुळे सुरेश वरपुडकर यांना मोठा दिलासा मिळाला असला तरी त्यांच्या कुटुंबातील ५ पैकी ४ जणांना पराभवाची चव चाखावी लागल्यामुळे परभणीच्या मतदारांनी त्यांची घराणेशाही नाकारल्याचे चित्र आहे.

नुकत्याच झालेल्या महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये सुरेश वरपूडकर यांच्या पत्नीचा विजय झाला होता. त्यानंतर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीतही त्यांनी आपल्या घरातील अधिकाधिक उमेदवार देण्याचा प्रयत्न केला होता, पण त्यांच्या या प्रयत्नाला आता अपयश आले आहे.

## मंत्री जयकुमार गोरेंच्या बालेकिल्ल्यात बंधूचा पराभव

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या निकालांनी सातारा जिल्ह्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून, मंत्री जयकुमार गोरे यांच्या कुटुंबातच विजयाचा आणि पराभवाचा विचित्र संगम पाहायला मिळाला आहे. आपल्या बंधू आणि वहिनीला निवडून आणण्यासाठी जयकुमार गोरे यांनी माण तालुक्यात सर्व शक्ती पणाला लावली होती. मात्र, कुकडवाड गटातील मतदारांनी त्यांचे बंधू अरुण गोरे यांना पराभवाची धूळ चारली. मंत्र्यांच्या बालेकिल्ल्यात सख्ख्या भावाचा झालेला हा पराभव भाजपसाठी मोठा धक्का मानला जात आहे. मात्र, याच वेळी औंध गटातून त्यांच्या वहिनी भारती गोरे यांनी मिळवलेला विजय जिल्ह्याभरात चर्चेचा विषय ठरला आहे. या गटात विजयाचे पारडे शेवटच्या क्षणापर्यंत हेलकावे खात होते. सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेसच्या मनीषा फडतरे ४० मतांनी विजयी झाल्याची चर्चा असतानाच, भाजपच्या आक्षेपानंतर करण्यात आलेल्या फेरमतमोजणीत भारती गोरे यांनी बाजी मारली.

## महायुतीच्या नावावर कमळ पाडणाऱ्यांना सोडणार नाही




■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
सिंधुदुर्ग जिल्हा परिषद निवडणुकीच्या निकालात भाजपच्या विजयावर शिक्कामोर्तब झाले असले तरी, अंतर्गत गटबाजीवरून राजकीय वातावरण तापले आहे. फडणवीस यांच्या नेतृत्वावर सिंधुदुर्गाच्या जनतेने विश्वास दाखवला, मात्र काही लोकांनी महायुतीत राहूनच 'कमळ' पाडण्याचे काम केले, असा आरोप मंत्री नितेश राणे यांनी केला आहे.

विशेषतः सावंतवाडी येथील बंडखोर अपक्षांच्या मुद्द्यावरून त्यांनी स्वपक्षातील आणि महायुतीतील काही नेत्यांना जाहीर इशारा दिला आहे.

नितेश राणे यांनी या विजयाचे श्रेय देवेंद्र फडणवीस आणि रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाला दिले. सत्तेचा वापर करून ग्रामीण भागातील शेवटच्या टोकापर्यंत विकास पोहोचवणार असल्याचे ते म्हणाले. राणे साहेबांनी जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न साडेचार लाखांपर्यंत नेण्याचा संकल्प केला आहे, तो जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या माध्यमातून साध्य करू, असा विश्वासही नीतेश राणे यांनी व्यक्त केला.

## पुणे मनपाच्या महापौरपदी मंजुषा नागपुरे



### उपमहापौरपदी परशुराम वाडेकर

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ९ :**
पुणे महानगरपालिकेत सोमवारी मनपा सभागृहात महापौर आणि उपमहापौर पदाची निवडणूक पार पडली.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून यावेळी काम पाहिले. भारतीय जनता पक्षाच्या मंजुषा नागपुरे यांची महापौर पदी बिनविरोध निवड तर उपमहापौरपदी परशुराम वाडेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आलेली आहे.

तीन सदस्य यांनी पुणे मनपा महापौर पदासाठी अर्ज दाखल केले होते. भारतीय जनता पक्षाकडून मंजुषा नागपुरे, राष्ट्रवादी काँग्रेसपक्षाकडून शितल सावंत तर काँग्रेसकडून अश्विनी लांडगे यांनी उमेदवारी अर्ज महापौर पदासाठी दाखल केला होता. त्यापैकी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शीतल अजय सावंत आणि काँग्रेसकडून अश्विनी लांडगे यांनी त्यांची नावे १५ मिनिटांच्या माघारी वेळेत मागे घेतली आहे. भारतीय जनता पक्षाचे गटनेते गणेश बिडकर यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गटनेत्यांशी चर्चा करून संबंधित निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी शिष्टाई केली आणि ती फळाला आली. त्यानंतर मंजुषा नागपुरे यांची महापौरपदी बिनविरोध निवड करण्यात आली. नंतर सभागृहात उपस्थित सदस्यांनी त्यांचे स्वागत केले.

उपमहापौर पदासाठी तीन जणांनी सहा अर्ज दाखल केले होते. त्यापैकी अर्ज माघारी मुदतीत अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया राबविण्यात आली. उपमहापौर पदासाठी काँग्रेस पक्षाकडून साहिल केदारी यांनी दोन अर्ज दाखल केले. भाजपकडून परशुराम वाडेकर यांनी देखील तीन अर्ज दाखल केले. तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून दत्ता बहिरट यांनी अर्ज दाखल केले होते. संबंधित अर्ज माघारी घेण्यासाठी १५ मिनिटांचा वेळ देण्यात आला. त्यामध्ये पुन्हा एकदा भाजप गटनेते गणेश बिडकर यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेत्यांशी चर्चा केली. अखेर उपमहापौरपदी साहिल केदारी आणि दत्ता बहिरट यांनी अर्ज माघारी घेतला. त्यानंतर परशुराम वाडेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

## एसटीच्या ताफ्यात आता राजमाता जिजाऊ बस

### मार्चपासून सेवेत दाखल : ५५ आसनी बसचे भगव्या-शुभ्र रंगात दर्शन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. राज्याच्या वैभवशाली इतिहासाचा वारसा जपत एसटीच्या ताफ्यात येणाऱ्या नव्या ५५ आसनी अत्याधुनिक बसेसचे नाव राजमाता जिजाऊ ठेवण्यात आल्याची घोषणा राज्याचे परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली.

शिवनेरी, शिवशाही, शिवाई आणि हिरकणी यांसारख्या नावांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ओळख निर्माण करणाऱ्या एसटीने आता स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ साहेबांच्या नावाने नवी सेवा सुरू केली आहे. भगव्या आणि शुभ्र पांढऱ्या मोहक रंगसंगतीत सजलेल्या या बसेस मार्च महिन्यापासून टप्प्याटप्प्याने रस्त्यांवर धावणार आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य संकल्पनेमागील प्रेरणास्थान असलेल्या जिजाऊ साहेबांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे, असे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.




**: ठळक वैशिष्ट्ये :**

आसन क्षमता : ५५ (अत्याधुनिक ३ बाय २ रचना).

रंगसंगती : महाराष्ट्राची परंपरा दर्शवणारा भगवा आणि शुभ्र पांढरा रंग.

उपलब्धता : मार्च २०२६ पासून टप्प्याटप्प्याने सुरुवात.नियोजन : दोन शहरांमधील अति गर्दीच्या मार्गांना प्राधान्य.

प्रवाशांना मोठा दिलासा

नेहमीच्या बसेसमध्ये ४० आसन क्षमता असताना नव्या ह्यराजमाता जिजाऊह्व बसमध्ये ३ बाय २ आसन रचनेमुळे ५५ प्रवासी सुखकर प्रवास करू शकणार आहेत. यामुळे गर्दीच्या मार्गावर उभे राहून प्रवास करावा लागणाऱ्या सुमारे १५ जादा प्रवाशांना बसण्याची सोय होईल.

महासागर अमरावती
मंगळवार, दि. 10 फेब्रुवारी 2026
पान 3



अमरावती– श्री समर्थ गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त अमरावती येथील विवेकानंद कॉलनी, समर्थ कॉलनी व श्री विकास कॉलनी परिसरात पालखी सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी गोपाळ काला व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी आकाश लक्षणे महाराजांचे कीर्तन लक्षणीय ठरले. प्रगट दिनासाठी मंदिराची आकर्षक सजावट करण्यात आली होती व भाविक भक्त सेवाकार्यात तल्लीन झाले होते.

# आजपासून बारावीची बोर्ड परीक्षा

## अमरावतीत 35,934 विद्यार्थ्यांची तयारी पूर्ण



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 9) –** बारावीच्या बोर्ड परीक्षा मंगळवार, 10 फेब्रुवारीपासून सुरू होत असून जिल्हा प्रशासन व शिक्षण विभागाने परीक्षेसाठी सर्व तयारी पूर्ण केली आहे. अमरावती जिल्ह्यातील 137 परीक्षा केंद्रांवर एकूण 35,934 विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत. त्यामध्ये 34,720 नियमित विद्यार्थी व 1,134 पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

परीक्षेदरम्यान कॉपी प्रकार रोखण्यासाठी तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष कार्यक्षमता समिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सुमारे 85 टक्के परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे देखरेख ठेवण्यात येणार असून 43 संवेदनशील केंद्रांवर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. ज्या केंद्रांवर सीसीटीव्ही व्यवस्था नाही, त्या ठिकाणी केंद्रप्रमुख व पर्यवेक्षकांची अदलाबदल करण्यात आली आहे.

परीक्षेच्या काळात प्रत्येक केंद्रावर कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येणार असून महसूल विभागाची विशेष उड्डाण पथके सक्रिय राहणार आहेत. पंचायत समिती स्तरावर वर्ग–1 व वर्ग–2 अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वीजपुरवठा खंडित होऊ नये म्हणून महावितरणला सतर्क राहण्याचे निर्देश देण्यात आले असून विद्यार्थ्यांना वेळेत परीक्षा केंद्रांवर पोहोचता यावे, यासाठी परिवहन विभाग अतिरिक्त बसेसची व्यवस्था करणार आहे. एकूण विभागात 1 लाख 57 हजार 267 विद्यार्थी 543 परीक्षा केंद्रांवर परीक्षेला बसणार असून 130 केंद्रे संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आली आहेत.

जिल्ह्यांमध्ये बारावीच्या परीक्षेसाठी बसणारे विद्यार्थी

| जिल्हा | विद्यार्थी | केंद्रे | संवेदनशील केंद्रे |
|---|---|---|---|
| अकोला | 27,035 | 87 | 22 |
| अमरावती | 35,929 | 137 | 43 |
| बुलढाणा | 36,364 | 117 | 15 |
| यवतमाळ | 35,570 | 128 | 22 |
| वाशिम | 22,369 | 74 | 28 |

### उपद्रवी केंद्रांवरील विशेष उपाययोजना

जिल्ह्यातील 43 परीक्षा केंद्रे संवेदनशील घोषित करण्यात आले आहे. यावर उपयोजना म्हणून 85 टक्के केंद्रांवर सीसीटीव्ही देखरेख राहणार आहे. सीसीटीव्ही नसलेल्या केंद्रांवर केंद्रप्रमुख व पर्यवेक्षकांची अदलाबदल करण्यात आली आहे. उपाययोजना म्हणून महसूल विभागाची विशेष उड्डाण पथके सक्रिय राहणार आहेत. प्रत्येक केंद्रावर कडक पोलिस बंदोबस्त राहणार असून वर्ग–1 व वर्ग–2 अधिकाऱ्यांची नियुक्ती करून तपासणी केली जाईल.



## भिलटेक येथील नागोबा देवस्थानाची दानपेटी फोडली

**अमरावती –** चांदूर रेल्वे पोलीस ठाणे हद्दीतील तीर्थक्षेत्र भिलटेक येथील प्रसिद्ध नागोबा देवस्थानातील दानपेटी अज्ञात चोरट्यांनी फोडली. यामध्ये चोराने दानपेटीतील सुमारे 40 ते 45 हजार रुपयांची रोकड लंपास केली. ही घटना रविवारी उघडकीस आली आहे. याप्रकरणी शेतकरी अंकुश नरेंद्र तायडे (वय 25) यांच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भिलटेक येथील नागोबा देवस्थान हे अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण विदर्भात श्रद्धास्थान म्हणून प्रसिद्ध आहे. मागील एक महिन्यापासून प्रत्येक शनिवार व रविवार येथे यात्रा भरत असून, मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होत होती. या संधीचा फायदा घेत 7 फेब्रुवारीच्या रात्री अज्ञात चोरट्यांनी मंदिरात प्रवेश करून दानपेटीचे कुलूप तोडले व त्यातील सुमारे 40 ते 45 हजार रुपये चोरून नेले. सकाळी नागरिक झोपेतून उठल्यानंतर मंदिरात चोरी झाल्याचा प्रकार उघडकीस आला.

## मनोरुग्ण युवतीवर अत्याचार; आरोपी अटकेत

### शिरखेड पोलीस ठाणे हद्दीतील धक्कादायक घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 9) –** शिरखेड पोलीस ठाणे हद्दीतील एका गावात 22 वर्षीय मनोरुग्ण युवतीवर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना रविवारी उघडकीस आली आहे. पीडितेच्या मामाने दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. संजय डोळस (वय 43) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडिता ही मनोरुग्ण असून ती आपल्या वृद्ध आजी–आजोबांसोबत गावात राहत होती. 8 फेब्रुवारी रोजी दुपारच्या सुमारास आरोपी संजय डोळस याने पीडितेला गावातील कोंडवाड्याच्या मागील बाजूस नेले, तेथे तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. यावेळी गावातील नागरिकांसह पीडितेचे आजोबा व मामा यांनी आरोपीला पीडितेसोबत पाहिले. यानंतर तात्काळ शिरखेड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी संजय डोलस याला ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध अत्याचाराचा गुन्हा नोंदविला आहे. घटनेची माहिती मिळताच अमरावती ग्रामीण पोलिसांची फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणाचा तपास पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दीपक दळवी, संजय वाघमारे व नितेश वाघ हे करीत आहेत.

## आलमारीतून रोखसह दागिन्यांची चोरी

**अमरावती –** चांदूर बाजार पोलीस ठाणे हद्दीतील पटवारी कॉलनीत घरफोडीची घटना 8 फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. येथील गोपाळ अंबादास विल्हेकर हे कुटुंबासह घराला कुलूप लावून बाहेरगावी गेले होते. घराची चावी त्यांनी भाडेकरूकडे ठेवली होती. या दरम्यान अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून आलमारीतील दागिने व रोख रक्कम असा एकूण 1 लाख 21 हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. गोपाळ विल्हेकर यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मॉर्निंग वॉक करणाऱ्या विद्यार्थ्याचा मोबाईल हिसकावला


### दोघांना पकडले  महादेवखोरी–यशोदानगर मार्गावरील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 9) –** शहरातील महादेवखोरी–यशोदानगर मार्गावर मॉर्निंग वॉक करत असलेल्या 16 वर्षीय विद्यार्थ्यांचा मोबाईल दुचाकीवरून आलेल्या दोघा युवकांनी हिसकावून नेल्याची घटना घडली. दरम्यान विद्यार्थ्यांने आरडाओरड केल्यानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ पाठलाग करून मोबाईल हिसकावणाऱ्या दोघांनाही पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. ही घटना सोमवार, 9 फेब्रुवारी रोजी सकाळी साडेसहा वाजता घडली. मिळालेल्या माहितीनुसार, फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीतील शांतिनगर येथील रहिवासी निजल राजेश गवई (वय 16) हा सोमवारी सकाळी मॉर्निंग वॉकसाठी महादेवखोरी ते यशोदानगर मार्गावरून जात होता. उड्डाणपुलाजवळ दुचाकीवरून आलेले दोघे युवक त्याच्या मागून आले. निजल मोबाईलवर बोलत असताना मागे बसलेल्या युवकाने अचानक त्याचा मोबाईल हिसकावून दुचाकीसह पळ काढला. यावेळी निजलने जोरात आरडाओरड केल्याने मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या नागरिकांनी तत्काळ पाठलाग करत दोघांनाही पकडले. घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिस घटनास्थळी दाखल झाले व दोघांना ताब्यात घेतले. चौकशीत मोबाईल हिसकावणारे दोघेही अल्पवयीन असल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## अपहरण करून अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

### पतीविरुद्ध गुन्हा दाखल



**अमरावती, (दि. 9) –** परतवाडा पोलीस स्टेशन परिसरातील एका व्यक्तीने 15 वर्षीय अल्पवयीन मुलीला प्रेम जाळ्यात अडकून, तिचे अपहरण केले आणि तिच्याशी मंदिरात जाऊन लग्न केले. त्यानंतर त्याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला, त्यामुळे ती सहा महिन्यांची गर्भवती राहिली. याप्रकरणात पीडितेच्या तक्रारीवरून परतवाडा पोलिसांनी पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

माहितीनुसार, आरोपी तरुण कामासाठी अल्पवयीन मुलीच्या गावी गेला होता. तिथे त्यांची भेट झाली आणि त्यांनी फोनवर बोलणे सुरू केले. दरम्यान, फेब्रुवारी 2025 मध्ये आरोपीने तिला लग्नाचा प्रस्ताव दिला. पीडितेने लग्नाबद्दल बोलताच तिने सांगितले की तिचे कुटुंब लग्नाला परवानगी देणार नाही. यानंतर, आरोपी तरुणाने अल्पवयीन मुलीचे अपहरण केले आणि तिला मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यातील गंगाखेड येथे नेले, जिथे ते गावाबाहेर झोपडीत स्थायिक झाले. अल्पवयीन असूनही, तरुणाने पीडितेवर लैंगिक अत्याचार केला. त्यानंतर त्यांनी तिला मंदिरात नेले आणि तिच्याशी लग्न केले. त्यानंतर, आरोपी आणि अल्पवयीन मुलगी गावात परतले आणि तिथे पुन्हा तिच्यावर अत्याचार केले. दरम्यान एक अंगणवाडी सेविका पीडितेला डॉक्टरकडे घेऊन गेली, जिथे ती सहा महिन्यांची गर्भवती असल्याचे आढळून आले. त्यानंतर पीडितेच्या तक्रारीवरून, परतवाडा पोलिसांनी तिच्या पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला. ही घटना अकोला जिल्ह्यातील बाळापूर येथे घडली असल्याने, हा गुन्हा वर्ग करण्यात आला आहे.

## रस्ता अपघातात पती ठार, पत्नी गंभीर जखमी

### आसेगाव पूर्णा–दर्यापूर मार्गावरील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 9) –** आसेगाव पूर्णा ते दर्यापूर या मार्गावरील हिवरा पूर्णा फाट्याजवळ रविवारी रात्री भीषण वाहन अपघात घडला. या अपघातात सुखदेव शिवराम गवई (वय 55, रा. खोलापूर पांढरी, ता. भातकुली) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून त्यांची पत्नी सुरेखा सुखदेव गवई (वय 50, रा. दारापूर, खोलापूर) या गंभीर जखमी झाल्या आहेत. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

प्राप्त माहितीनुसार, रविवारी रात्री सुमारे 8.30 वाजताच्या सुमारास गंभीर जखमी अवस्थेत असलेल्या सुखदेव गवई यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. अपघाताची तीव्रता इतकी होती की घटनास्थळीच गंभीर दुखापत झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या अपघातात त्यांची पत्नी सुरेखा गवई यांना गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांच्या प्रकृतीबाबत डॉक्टरांकडून सतत निरीक्षण ठेवण्यात येत आहे. अपघातानंतर काही काळ त्या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत करत जखमींना रुग्णालयात पोहोचवले. घटनेची माहिती मिळताच आसेगाव पूर्णा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून वाहनाचा वेग, रस्त्याची स्थिती किंवा अन्य कारणामुळे हा अपघात झाला का, याबाबत पोलीस तपास सुरू आहे. पुढील तपास आसेगाव पूर्णा पोलीस करीत आहेत. दरम्यान, पतीच्या मृत्यूने आणि पत्नीच्या गंभीर जखमी अवस्थेमुळे गवई कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली आहे.

## शेताजवळून दुचाकी चोरीस

**अमरावती –** शिरजगाव कसबा पोलीस ठाणे हद्दीतील खडकाळीपुरा येथील रहिवासी सुरेश नारायण राजस (वय 53) हे दुचाकीने शेतात गेले होते. शिरजगाव कसबाङ्करजगाव मार्गावरील शेताजवळ त्यांनी दुचाकी उभी केली होती. शेतातून परतल्यानंतर त्यांना दुचाकी चोरीस गेल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी सुरेश राजस यांच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीविरुद्ध वाहन चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अमरावती ग्रामीण पोलीस दलात 214 शिपाई पदांसाठी भरती

**11 ते 26 फेब्रुवारीदरम्यान जोग स्टेडियम येथे शारीरिक चाचण्या; बाहेरगावच्या उमेदवारांसाठी मोफत निवासाची सोय**

### 21 हजारांहून अधिक अर्ज



**अमरावती, (दि. 9) –** महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई पदभरती सन 2025–26 अंतर्गत अमरावती ग्रामीण पोलीस दलात 214 रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया दि. 11 फेब्रुवारी ते 26 फेब्रुवारी 2026 या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या भरतीसाठी तब्बल 21,206 उमेदवारांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले असून, त्यामध्ये 16,286 पुरुष व 4,920 महिला उमेदवारांचा समावेश आहे.

या भरती प्रक्रियेत सर्वसाधारण 69, महिला 64, खेळाडू 10, प्रकल्पग्रस्त 10, भूकंपग्रस्त 4, माजी सैनिक 31, अंशकालीन पदविधर 10, पोलीस पाल्य 6 व गृहरक्षक 10 अशा प्रवर्गनिहाय पदांचा समावेश आहे. भरती प्रक्रियेअंतर्गत दि. 11 ते 23 फेब्रुवारीदरम्यान पुरुष उमेदवारांची, तर दि. 24 ते 26 फेब्रुवारीदरम्यान महिला उमेदवारांची कागदपत्र पडताळणी व शारीरिक चाचणी घेण्यात येणार आहे. दरम्यान दि. 15, 19 व 22 फेब्रुवारी रोजी शासकीय सुट्टी असल्याने त्या दिवशी भरती प्रक्रिया होणार नाही, अशी माहिती पोलीस प्रशासनाने दिली आहे. ही संपूर्ण भरती प्रक्रिया जोग स्टेडियम, पोलीस आयुक्त कार्यालयाच्या मागे, मालटेकडी परिसर, अमरावती येथे पार पडणार असून सुरुवातीला दररोज सुमारे 800 उमेदवारांना, तर शेवटच्या टप्प्यात 2,000 उमेदवारांना शारीरिक चाचणीसाठी बोलावण्यात येणार आहे. बाहेरगावाहून येणाऱ्या उमेदवारांसाठी वसंत हॉल, मालटेकडी येथे मोफत निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. उमेदवारांनी त्यांना नेमून दिलेल्या दिवशी सकाळी 5 वाजता भरतीस्थळी हजर राहणे बंधनकारक असून, सर्व शैक्षणिक कागदपत्रे, प्रवर्ग प्रमाणपत्रे, भरती ओळखपत्र, पासपोर्ट फोटो व मूळ कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत आणाव्यात. भरतीस्थळी मोबाईल, कॅमेरा किंवा कोणत्याही मौल्यवान व इलेक्ट्रॉनिक वस्तू नेण्यास सक्त मनाई असून, एकदा प्रवेश मिळाल्यानंतर कोणत्याही कारणास्तव बाहेर जाता येणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, भरतीच्या नावाखाली कोणीही पैशांची मागणी केल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती (दूरध्वनी = 0721–2553055) किंवा पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. भरतीसंदर्भात अडचणी असल्यास हेल्पलाईन क्रमांक 7030006819 वर संपर्क साधण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# चित्रा चौक उड्डाणपुलाच्या पिलरला ट्रकची धडक

### मोठा अनर्थ टळला; घटनेनंतर वाहतूक पोलीस तैनात



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 9) –** चित्रा–पठाण चौक उड्डाणपुलाचे रखडलेले बांधकाम पुन्हा सुरू असतानाच सोमवारी सकाळी सुमारे 11 वाजताच्या सुमारास एका ट्रकने उड्डाणपुलाच्या पिलरला जोरदार धडक दिल्याची घटना घडली. धडक इतकी तीव्र होती की, पिलरवरील पुलाचा संपूर्ण ढाचा हादरला. सुदैवाने पिलर कोसळला नाही, अन्यथा मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. या घटनेनंतर परिसरात काही काळ एकच खळबळ उडाली.

उड्डाणपुलाचे बांधकाम प्रलंबित असल्याने या मार्गावरील वाहतूक आधीच रोखण्यात आली आहे. मात्र ट्रक चालकाचे लक्ष न राहिल्याने तो बंद असलेल्या मार्गावर पुढे गेला आणि पिलरला धडक बसली, अशी माहिती सूत्रांनी दिली. या घटनेनंतर तत्काळ वाहतूक पोलीस घटनास्थळी तैनात करण्यात आले असून वाहतूक अधिक काटेकोरपणे नियंत्रित करण्यात येत आहे. एक बाजूचा मार्ग बंद ठेवून शैक्षणिक संकुलाच्या मैदानातून वाहनांची ये–जा वळवण्यात आली आहे. त्यामुळे चारचाकी व दुचाकी वाहनचालकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. या उड्डाणपुलाच्या कामासंदर्भात प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित असून याचिकेवर लवकरच पुढील सुनावणी होणार आहे. उड्डाणपुल पूर्ण करण्यासाठी न्यायालयाने दिलेली 31 डिसेंबरची मुदत केव्हाच संपुष्टात आली आहे. दरम्यान, या घटनेमुळे चित्राङ्कपठाण चौक उड्डाणपुलाच्या रखडलेल्या कामाकडे पुन्हा एकदा नागरिकांचे लक्ष वेधले गेले आहे. प्रशासनाने तातडीने सुरक्षिततेच्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वाहनचालकांकडून होत आहे.

# जागतिक राजकारणात अडकलेली भारतीय शेती

भारत आणि अमेरिका यांच्यातील प्रस्तावित व्यापार करारावरून देशभरात तीव्र चर्चा सुरू झाली आहे. हा करार केवळ दोन देशांतील व्यापार वाढवण्याचा प्रयत्न नाही, तर तो भारतीय शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था, लोकशाही प्रक्रिया आणि जागतिक राजकारण यांच्याशी थेट संबंधित आहे. मुक्त व्यापार करार ही संकल्पना ऐकायला आकर्षक वाटते, पण त्यामागील राजकीय अर्थशास्त्र आणि सामाजिक परिणाम अनेकदा असमान आणि विवादास्पद असतात. या करारामुळे कोणाला फायदा होणार आणि कोणाला त्याची किंमत चुकवावी लागणार, हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

----------------

या कराराच्या प्रारूपानंतर अनेक शेतकरी संघटनांनी चिंता व्यक्त केली असून १२ फेब्रुवारीपासून देशव्यापी आंदोलनाची तयारी सुरू केली आहे. शेतकऱ्यांच्या चिंता केवळ सोयाबीन तेल, धान्य किंवा सफरचंदावरील आयात शुल्क सवलतीपुरत्या मर्यादित नाहीत. या चिंता विश्वास, पारदर्शकता आणि भारतीय शेतीच्या भवितव्याशी संबंधित आहेत.

सरकारकडून वारंवार आश्वासन दिले जात आहे की शेती आणि दुग्ध उद्योग संरक्षित राहतील, परंतु कराराच्या मजकुरात अनेक कृषी आणि अन्नपदार्थांवरील शुल्क कमी करण्याची आणि गैर-शुल्क अडथळे हटवण्याची तरतूद असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता वाढली आहे.

याआधी युरोपियन युनियन आणि न्यूझीलंडसोबत झालेल्या मुक्त व्यापार करारांमुळे स्वस्त आयात मोठ्या प्रमाणावर वाढली आणि त्याचा फटका स्थानिक उत्पादकांना बसला. मुक्त व्यापार करारांचा इतिहास पाहिला तर, ते अनेकदा जागतिक व्यापाराच्या विस्तारासाठी महत्त्वाचे साधन ठरले आहेत. जागतिक व्यापार संघटना (WTO) स्थापनेनंतर टॅरिफ कमी करणे, बाजारपेठा खुल्या करणे आणि बहुपक्षीय व्यापार व्यवस्था निर्माण करणे हे जागतिक धोरण बनले.

परंतु जागतिक दक्षिणेकडील अनेक देशांचा अनुभव असा आहे की मुक्त व्यापार करारांचा लाभ मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या, निर्यातदार आणि प्रगत अर्थव्यवस्था यांना मिळतो, तर लहान शेतकरी, स्थानिक उद्योग आणि असंघटित कामगार वर्गावर त्याचा विपरीत परिणाम होतो. FAO आणि UNCTAD च्या अभ्यासानुसार, अनेक विकासशील देशांमध्ये कृषी बाजार खुल्या केल्यानंतर ग्रामीण उत्पन्नातील असमानता वाढली आणि लहान शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर घटले.

सफरचंद उद्योगाचे उदाहरण विशेष उल्लेखनीय आहे. हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि उत्तराखंडमध्ये सफरचंद हे केवळ पीक नसून संपूर्ण पर्वतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. अमेरिकन सफरचंदांवरील आयात शुल्क कमी झाल्यास आणि किमान आयात मूल्य वाढवल्यास हे सफरचंद भारतीय प्रीमियम सफरचंदांच्या किमतीत बाजारात उपलब्ध होतील.

परिणामी, भारतीय ग्राहक समान किमतीत अधिक दर्जेदार आयातित सफरचंदांना पसंती देतील आणि स्थानिक उत्पादकांचा बाजार हिस्सा घटेल. कोल्ड स्टोरेजमध्ये सफरचंद साठवणे तोट्याचे ठरू शकते आणि स्थानिक उद्योग संकटात सापडू शकतो.

सोयाबीन आणि धान्याच्या बाबतीतही अशीच परिस्थिती आहे. भारतात सोयाबीन उत्पादन प्रामुख्याने लहान आणि सीमांत शेतकऱ्यांद्वारे होते. एक एकर जमिनीत साधारणतः १ मेट्रिक टन सोयाबीन उत्पादन होते, तर अमेरिकेत जीएम सोयाबीनच्या माध्यमातून ३ मेट्रिक टनपर्यंत उत्पादन होते.

ही उत्पादकतेची दरी भारतीय शेतकऱ्यांसाठी असमान स्पर्धा निर्माण करते. त्यातच अमेरिकन शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर सरकारी सबसिडी मिळते. अमेरिकन शेतकऱ्यांना दरवर्षी सरासरी ६६,००० डॉलर इतकी सबसिडी मिळते आणि २०२६ साठी १२ अब्ज डॉलरचा विशेष सहाय्य कार्यक्रम प्रस्तावित आहे. याच्या तुलनेत भारतीय शेतकऱ्यांना मिळणारी मदत मर्यादित आहे आणि अनेकदा एमएसपीपेक्षा ३० ते ४० टक्के कमी दरात उत्पादन विकावे लागते. अशा स्थितीत मुक्त व्यापार म्हणजे असमान मैदानावर खेळण्यासारखे आहे.

**विकास परसराम मेश्राम**
**मु+पो, झरपडा,**
**ता. अर्जूनी/मोर, जि. गोंदिया.**
**7875592800**
vikasmeshram04@gmail.com

**पूर्वार्ध**

हा करार केवळ आर्थिक नसून राजकीयही आहे. अमेरिकेत मध्यावधी निवडणुका जवळ आल्या आहेत आणि कृषी क्षेत्र हा अमेरिकन राजकारणातील प्रभावी घटक आहे. चीनसोबतच्या व्यापार युद्धामुळे अमेरिकन शेतकऱ्यांना मोठे नुकसान झाले आणि निर्यात बाजार घटला. त्यामुळे ट्रम्प प्रशासनाला नवीन बाजारपेठांची गरज आहे.

भारत हा १४० कोटी लोकसंख्येचा विशाल बाजार असल्यामुळे अमेरिकेसाठी अत्यंत आकर्षक आहे. त्यामुळे भारताशी व्यापार करार हा अमेरिकन राजकीय रणनीतीचा महत्त्वाचा भाग मानला जातो. ग्रामीण अमेरिकेतील असंतोष कमी करणे आणि शेतकरी लॉबीला संतुष्ट करणे हे ट्रम्प प्रशासनासाठी राजकीयदृष्ट्या आवश्यक आहे.

या कराराचा सर्वात गंभीर पैलू म्हणजे पारदर्शकतेचा अभाव. शेतकरी संघटना, विरोधी पक्ष आणि काही राज्य सरकारांनी कराराचा संपूर्ण तपशील संसदेसमोर सादर करण्याची मागणी केली आहे. व्यापार करारांचा परिणाम देशांतर्गत कायद्यांइतकाच गंभीर असतो, कारण ते लाखो लोकांच्या उपजीविकेवर परिणाम करतात.

त्यामुळे संसदीय चर्चा, सार्वजनिक सल्लामसलत आणि प्रभाव मूल्यांकन आवश्यक आहे. लोकशाही प्रक्रियेशिवाय मोठ्या धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी केल्यास लोकांचा विश्वास ढासळतो आणि सामाजिक असंतोष वाढतो.

भारतीय शेती आधीच अनेक संकटांशी झुंज देत आहे. कर्जबाजारीपणा, हवामान बदल, वाढते उत्पादन खर्च, बाजारातील अस्थिरता आणि धोरणात्मक अनिश्चितता यामुळे शेतकरी त्रस्त आहेत.

आर्थिक सहयोग व विकास संघटना ओईसीडीच्या अहवालानुसार २००० ते २०२५ या कालावधीत भारतीय शेतकऱ्यांना १११ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत स्वस्त आयातीत उत्पादनांची लाट आली तर स्थानिक बाजार कोसळण्याची शक्यता आहे.

कापूस आयातीवरील शुल्क कमी केल्यानंतर देशांतर्गत किमती घसरल्याचे उदाहरण आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसला. अन्नपदार्थांची आयात म्हणजे ग्रामीण रोजगाराची घट आणि बेरोजगारी वाढ, असे अर्थशास्त्रज्ञांचे मत आहे.

भारतासाठी शेती हा केवळ आर्थिक उत्पादनाचा क्षेत्र नाही, तर तो ग्रामीण रोजगाराचा मुख्य स्रोत, सामाजिक स्थैर्याचा आधारस्तंभ आणि अन्नसुरक्षेचा कणा आहे. भारतात सुमारे ४५ टक्क्यांहून अधिक लोकसंख्या थेट किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे (World Bank, 2023). ग्रामीण भारतात शेती आणि संबंधित क्षेत्रे मिळून सुमारे १८ टक्के GDP योगदान देतात, परंतु रोजगारातील वाटा याहून अधिक आहे. त्यामुळे शेतीवर परिणाम करणारा कोणताही व्यापार करार हा केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक आणि राजकीय निर्णय ठरतो.

भारतीय आणि अमेरिकन शेतकऱ्यांमधील सर्वात मोठा फरक म्हणजे अनुदान आणि पायाभूत सुविधा. OECD च्या 'Producer Support Estimate' (PSE) अहवालानुसार, अमेरिकेत कृषी उत्पादनावर मोठ्या प्रमाणावर सरकारी सहाय्य दिले जाते.

कृषी संसाधन व्यवस्थापन सर्वेक्षण २०२० नुसार, एका अमेरिकन शेतकऱ्याला सरासरी ६६,३२४ डॉलर वार्षिक अनुदान मिळते. याशिवाय, अमेरिकन प्रशासनाने २०२६ मध्ये 'Farmers Bridge Assistance Program' अंतर्गत १२ अब्ज डॉलरचे अतिरिक्त सहाय्य जाहीर केले आहे. यामुळे अमेरिकन शेतकरी बाजारातील चढ-उतारांपासून संरक्षण मिळवतात आणि कमी किमतीतही उत्पादन विकू शकतात.

याउलट, भारतीय शेतकऱ्यांना मर्यादित अनुदान, अपुरी सिंचन सुविधा, कमकुवत साठवणूक व्यवस्था आणि बाजारातील अस्थिरता यांचा सामना करावा लागतो. FAO च्या अभ्यासानुसार, भारतातील लहान शेतकऱ्यांचे उत्पन्न OECD देशांच्या शेतकऱ्यांच्या तुलनेत १० ते १५ पट कमी आहे. किमान आधारभाव अनेकदा बाजारात प्रत्यक्षात मिळत नाही आणि अनेक पिकांसाठी टरढ पेक्षा ३० ते ४० टक्के कमी दर मिळतो. अशा परिस्थितीत अनुदानित अमेरिकन उत्पादनांशी स्पर्धा करणे भारतीय शेतकऱ्यांसाठी अत्यंत अवघड आहे.

**(उर्वरीत भाग पुढील अंकी)**

■ ■ ■

# जागतिक दर्जाचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे भारतातीलच नाही तर जगातील एक नावाजलेले विद्यापीठ आहे.

या विद्यापीठाची स्थापना १० फेब्रुवारी १९४९ रोजी झाली म्हणजे आज हे विद्यापीठाला ७७ वर्ष पूर्ण होऊन ७८ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. डॉ एम आर जयकर हे या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होते.

स्थापनेनंतर १२ जिल्ह्यांमध्ये उच्च शिक्षणाच्या विविध सुविधा पुरवण्याची जबाबदारी पुणे विद्यापीठावर होती. १९६४ मध्ये कोल्हापूर येथे छत्रपती शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेनंतर पुणे, नाशिक, धुळे, जळगाव या जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाचे कार्य सुरू झाले.

१९९० साली जळगाव येथे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर पुणे, नगर, नाशिक या जिल्ह्यांसह दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील महाविद्यालये या विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली काम करीत आहेत. २०१४ साली या विद्यापीठाचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असा नामविस्तार करण्यात आला.

पुण्यातील गणेशखिंड रस्त्यावर पुणे विद्यापीठाचे मुख्य संकुल आहे. विद्यापीठाची मुख्य इमारत पुणेकरांसाठी शैक्षणिक अस्मितेचे प्रतीक आहे. ही इमारत ब्रिटिश गव्हर्नरांच्या पुण्यातील मुक्कामासाठी एकोणिसाव्या शतकात बांधण्यात आली होती. इटालियन शैलीत बांधण्यात आलेली ही इमारत पुण्याला मिळालेला ऐतिहासिक वारसा आहे.

विद्यापीठाचा परिसर सुमारे ४९० एकराचा असून त्यात अनेक दुर्मिळ सुंदर आणि अतिशय मनमोहक असे वातावरण लाभले आहे. घनदाट जंगल, शोभिवंत हिरवळ, दुर्मिळ ब्रिटिशकालीन कारंजे व ऐतिहासिक अशी ब्रिटिशकालीन भव्य इमारत यामुळे हा परिसर निसर्गप्रेमी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक यांचे आकर्षण केंद्र राहिला आहे. पुणे विद्यापीठात दुर्मिळ तसेच सावली देणारे मोठे वृक्ष आहेत.

या वृक्षांची छाया, सौंदर्य आणि उत्साह निर्माण करणारे वातावरण विद्यार्थ्यांना अभ्यास व संशोधन करण्यास प्रोत्साहित करते. विद्यापीठातून विविध पदव्युत्तर विभाग व प्रशासकीय कार्यालयाचे कामकाज चालते. या विभागातून आज जवळपास ६ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ४२ शैक्षणिक विभाग, १२ आंतरविद्या शाखा व सेवा युनिट, २० अध्यासने, ८ राष्ट्रीय व प्रादेशिक केंद्र आहेत. ६९६ संलग्न महाविद्यालये, २८७ मान्यताप्राप्त व्यवस्थापन संस्था, १२१ मान्यताप्राप्त संशोधनकेंद्र विद्यापीठाशी संलग्न आहेत.

विद्यापीठातील विविध विभागात ६० हुन अधिक देशातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आपल्या विद्यार्थ्यांना परदेशी विद्यापीठातील अभ्यासक्रमाचेही फायदे व्हावेत यासाठी गेल्या काही काळात विद्यापीठाने परदेशातील नामांकित विद्यापीठांसोबत सामंजस्य करार केले आहेत. विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ जयकर यांच्या नावाने ओळखले जाणारे जयकर ग्रंथालय केवळ विद्यार्थ्यांनाच नाही तर विद्यापीठाबाहेरील संशोधक व अभ्यासकांनाही खेचून आणते.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

जयकर ग्रंथालय हे माहिती आणि संदर्भ ग्रंथासाठी भारतातीलच नव्हे तर जगातील जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथालयांपैकी एक आहे. जयकर ग्रंथालयात भारतीय व विदेशी मासिके घेतली जातात तसेच ग्रंथालयात काही नियतकालिके मोफत मिळतात. जयकर ग्रंथालयात ५ लाखांहून अधिक पुस्तके व विविध विषयांवरील मासिके आहेत. अशा सुविधांमुळेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राज्यातीलच नव्हे तर देशातील विद्यार्थ्यांच्या पहिल्या पसंतीचे विद्यापीठ आहे. पुणे विद्यापीठ ज्ञानाची निर्मिती, संरक्षण आणि प्रसारण करणारे जागतिक दर्जाचे विद्यापीठ आहे.

■ ■ ■



# यशवंत मनोहर युगसाक्षी प्रतिभेची ऊर्जाभेट

शब्दांची पूजा करत नाही मी, माणसांसाठी आरती गातो... असे म्हणत प्रस्थापितांचे निकष उधळून लावत नवप्रतिमासृष्टी निर्माण करणारे ज्येष्ठ कवी, साहित्यिक व विचारवंत डॉ. यशवंत मनोहर हे साहित्य विश्वातील प्रज्ञाशील युगसाक्षी प्रतिभेचे उत्तुंग सामाजिक व्यक्तिमत्त्व.

कविता, वैचारिक लेखन, समीक्षा, कादंबरी, प्रवासवर्णन, पत्रलेख, मृत्युलेख असे चौफेर लेखन करणारे डॉ. यशवंत मनोहर सर म्हणजे नवनिर्माणाचे रचनात्मक विद्यापीठ. माजी सनदी अधिकारी इ. झेड. खोब्रागडे यांनी पत्नीवर लिहिलेले 'रेखा' हे पुस्तक सस्नेह भेट देण्यासाठी आम्ही यशवंत मनोहर सरांचे निवासस्थान 'लुंबिनी'वर दाखल झालो.

आदरणीय यशवंत मनोहर सरांनी इ. झेड. खोब्रागडे, रेखा खोब्रागडे, दिगंबर गोंडाणे, माझी पत्नी छाया मेश्राम, आमचे कार्यालय अधीक्षक मंगलप्रसाद रहांगडाले व मी डॉ. महेंद्रकुमार मेश्राम, आम्हा सर्वांचे अगत्याने स्वागत केले.

इ. झेड. खोब्रागडे व रेखा खोब्रागडे यांनी मनोहर सरांना 'रेखा' पुस्तक भेट दिले. पत्नीवर पुस्तक लिहिणारे पहिले सनदी अधिकारी लेखक असे म्हणत मनोहर सरांनी इ. झेड. खोब्रागडे यांचे कौतुक व अभिनंदन केले. मी सुद्धा माझा 'लॉकडाऊन' कवितासंग्रह आणि 'स्वयंसहाय्यता चळवळीतील महिलांची वाटचाल' हे संशोधन ग्रंथ मनोहर सरांना आदरपूर्वक भेट दिले.

मनोहर सरांनी त्यांचा संविधान आणि भारतीयत्व हा अत्यंत मौलिक वैचारिक ग्रंथ तसेच 'In the Rain of Fire' हा कवितासंग्रह आमच्या हाती देऊन आम्हा सर्वांना सन्मानित केले. साहित्य, समाज, चळवळ, राजकारण, निवडणुका इत्यादी विषयावर जवळपास दोन तास आमची अत्यंत ऊर्जादायी चर्चा झाली.

चर्चेदरम्यान सर आमची पुस्तकेही चाळत होते आणि बोलतही होते. सरांना केवळ ऐकतच राहावे. ही वेळ संपूच नये, असे वाटत होते. यशवंत मनोहर सर म्हणजे जणू विचारांची आयुध निर्माणीच. यावेळी जेष्ठ कवी भाऊ पंचभाई यांची आठवण काढत सर हळहळले.

सरांची ही भेट जणू नवनिर्माणाची कार्यशाळाच होती असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. यशवंत मनोहर सरांनी लिहिलेल्या यशोधरा, सावित्री व रमाई या कादंबरीवर सुद्धा चर्चा करताना मनोहर सरांनी यशोधरेचे मानसशास्त्र उलगडले.

माईसाहेब आंबेडकर यांच्या बद्दल सुद्धा मनोहर सर कृतज्ञतापूर्वक भरभरून बोलले. कादंबरी कशी लिहावी? या इ. झेड. खोब्रागडे यांच्या प्रश्नावर मनोहर सरांनी संवादाची विविध उदाहरणे देत कादंबरीचा फॉर्म समजावून सांगितला.



**डॉ. महेंद्रकुमार मुरलीधर मेश्राम**
**२४, राजगृह, शंभूनगर,**
**कोराडी रोड, नागपूर.**
**९९७५६६५८६२**

यावेळी मनोहर सरांच्या सुविद्य पत्नी पुष्पलता मनोहर या सुद्धा चर्चेत सहभागी झाल्याने आमच्या अनौपचारिक गप्पांची मैफिल अधिक रंगतदार झाली.

गुडघेदुखीचा प्रचंड त्रास व पायावर खूप सुजन असूनही मनोहर सर साहित्य निर्मितीच्या विविध प्रकल्पावर प्रचंड काम करीत आहेत. येत्या २६ मार्च रोजी मी वयाच्या ८४ व्या वर्षात झेप घेत आहे, असे म्हणत लुंबिनीच्या गेट पर्यंत येऊन आम्हाला निरोप देणा?या यशवंत मनोहर सरांचा उत्साह तरुणांनाही लाजवेल असा ओसंडून वाहताना बघून खूप ऊर्जावान झाल्यासारखे वाटले. डॉ. यशवंत मनोहर सरांना सुदृढ आरोग्य व दीर्घायुष्य लाभो हीच मंगलकामना.

■ ■ ■

# ग्रामीण विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देणारे 'नवशिल्पकार' मुकेश पाटील टाकळीकर

**माणूसपणाची पाऊलवाट**



**सुजाता बंडावार**

ग्रामीण भागातील मातीत शिक्षणाचे बीज पेरणे सोपे असते, पण त्या बीजाचा महावृक्ष करून हजारो विद्यार्थ्यांना त्याची शीतल सावली देणे हे एका तपस्येपेक्षा कमी नसते.

आदरणीय मोहन पाटील टाकळीकर यांनी ही तपस्या सुरू केली आणि त्यांचे सुपुत्र मुकेश पाटील टाकळीकर यांनी आपल्या आधुनिक दृष्टीकोनातून आणि कठोर परिश्रमाने या तपस्येला 'नववैभवाचे' कोंदण प्राप्त करून दिले आहे.

वडिलांनी उभारलेला शैक्षणिक कणा आणि आई सावित्रा मोहन पाटील टाकळीकर यांचे सेवाभावी संस्कार घेऊन वाढलेल्या मुकेश यांनी केवळ पदव्या संपादन केल्या नाहीत, तर त्या ज्ञानाचा उपयोग ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचवण्यासाठी केला.

पाचगणीच्या संजीवन शाळेतून शिस्तीचे धडे गिरवलेले मुकेश, मार्केटिंगमध्ये एमबीए आणि कायद्याचे उच्च शिक्षण घेतल्यावर मोठ्या पगाराच्या नोकरीच्या मागे धावू शकले असते, मात्र त्यांनी आपल्या मातीचे ऋण फेडण्याचे ठरवले.

वयाच्या अवघ्या २४ व्या वर्षी, जेव्हा तरुण स्वतःच्या करिअरची स्वप्ने पाहतात, तेव्हा मुकेश पाटील यांनी हजारो तरुणांच्या आयुष्याला दिशा देण्याचे शिवधनुष्य पेलले. सुरुवातीला या क्षेत्राचा अनुभव नसतानाही, एका नवशिक्या विद्यार्थ्याप्रमाणे त्यांनी आपल्या वडिलांच्या मार्गदर्शनाखाली हा खडतर प्रवास सुरू केला आणि बघता बघता शिवाजी शैक्षणिक प्रतिष्ठानला राज्यातील पहिल्या पाच संस्थांमध्ये मानाचे स्थान मिळवून दिले.

१९८७ पासून कार्यरत असलेल्या या संस्थेचा विस्तार करताना त्यांनी कधीही गुणवत्तेशी तडजोड केली नाही. वाजेगावच्या मुलींसाठी सुरू केलेले हायस्कूल असो, अल्पसंख्यांक समुदायासाठी उभे केलेले उर्दू विद्यालय असो किंवा नांदेडमधील विद्यार्थ्यांसाठी माहिती तंत्रज्ञानाचे दरवाजे उघडून देणारे विवेकानंद इन्स्टिट्यूट असो; प्रत्येक पाऊल हे सामाजिक बांधीलकीतून पडले आहे. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पत्रकारिता आणि समाजकार्य यासारखे अभ्यासक्रम उपलब्ध करून देऊन त्यांनी मराठवाड्यातील तरुणांचे पुणे-मुंबईकडे होणारे स्थलांतर थांबवले.



आज ही संस्था केवळ एक इमारत नसून हजारो कुटुंबांचा आधारवड झाली आहे. अत्याधुनिक प्रयोगशाळा, समृद्ध ग्रंथालय आणि तज्ज्ञ प्राध्यापक यांच्या बळावर त्यांनी जागतिक स्पर्धेत टिकणारे विद्यार्थी घडवले आहेत.

सिनेट सदस्य डॉ. दीपक बच्चेवार, पत्रकार संजीव कुलकर्णी, प्रा. बालाजी लाभशेटवार, डॉ. सतीश कोकाटे, डॉ चंदन बोरा, प्रवीण काळे, प्राध्यापक धर्मराज हनवटे, बालाजी बच्चेवार. गजानन पंपटवार सर अशा अनेक सहकाऱ्यांच्या साथीने, व्यवस्थापनातील आर्थिक आणि मानवी पैलू त्यांनी कौशल्याने हाताळले.

विद्यार्थ्यांचे यश हेच आपले यश मानणाऱ्या मुकेशजींची दृष्टी आता वैद्यकीय क्षेत्रातील डी.एम.एल.टी. आणि नर्सिंगसारख्या कोर्सेसच्या माध्यमातून ग्रामीण आरोग्याला बळकटी देण्याकडे लागली आहे. आनंदवन मित्रमंडळाच्या माध्यमातून त्यांनी केलेले सामाजिक कार्य ही त्यांच्या संवेदनशीलतेची साक्ष आहे.

मुकेश पाटील टाकळीकर म्हणाले, लोक म्हणतात की मी वडिलांचा वारसा पुढे चालवतोय, पण मला वाटतं मी माझ्या वडिलांनी पाहिलेल्या स्वप्नांना सत्यात उतरवण्यासाठी रात्रंदिवस धडपडत आहे. माझ्यासाठी शिवाजी शैक्षणिक प्रतिष्ठान ही केवळ एक संस्था नसून ते एक मंदिर आहे, जिथे ग्रामीण भागातील सामान्य विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील चमक मला ऊर्जा देते.

जेव्हा एखादा विद्यार्थी मोठ्या पदावर गेल्यावर 'सर, आज मी जे काही आहे ते संस्थेमुळे आहे' असं म्हणतो, तेव्हा डोळ्यांत दाटून येणारे पाणी हे कोणत्याही मोठ्या पुरस्कारापेक्षा मोलाचे असते.

वडील माझे मार्गदर्शक आहेतच, पण त्यांची पुण्याई आणि आईचे आशीर्वाद हीच माझी खरी पुंजी आहे. हे वैभव माझे नाही, तर त्या प्रत्येक कष्टकरी बापाच्या मुलाचे आहे ज्याच्या स्वप्नांना आम्ही पंख देऊ शकलो. मुकेश यांचे वडील मोहन पाटील टाकळीकर म्हणाले,

एका बापासाठी यापेक्षा आनंदाचा क्षण दुसरा कोणता असू शकतो, जेव्हा जग त्याला त्याच्या मुलाच्या नावाने ओळखू लागते? मी लावलेल्या रोपट्याचा आज वटवृक्ष झाला आहे, याचे सर्व श्रेय मुकेशच्या जिद्दीला आणि दूरदृष्टीला जाते. त्याने केवळ संस्था मोठी केली नाही, तर त्यामध्ये नीतिमत्ता आणि मूल्यांचे अधिष्ठान ठेवले.

त्याने आधुनिक तंत्रज्ञान आणि आपली ग्रामीण संस्कृती यांचा जो संगम साधला आहे, तो पाहून मला आज निश्चिंत वाटते. माज्या कष्टाचे ख?या अथार्ने सोने झाले आहे आणि आमची ही ज्ञानगंगा मुकेश अशाच पवित्र भावनेने पुढे नेईल, याची मला खात्री आहे.

मोहन पाटील टाकळीकर यांनी पेरलेल्या ध्येयवादी विचारांच्या बीजाचे आज मुकेश पाटील यांच्या अफाट कष्टाने आणि आधुनिक दूरदृष्टीने एका विशाल कल्पवृक्षात रूपांतर झाले आहे. हा प्रवास केवळ एका शिक्षण संस्थेची प्रगती दर्शवणारा नसून, ग्रामीण भागातील सामान्य गुणवत्तेला जागतिक स्पर्धेच्या व्यासपीठावर नेऊन ठेवण्याचा एक यशस्वी लढा आहे.

वडिलांनी दिलेला 'वारसा' आणि स्वतःच्या कर्तृत्वाने निर्माण केलेला 'भरोसा' यांचा सुंदर मेळ मुकेश पाटील यांनी साधला आहे. त्यांच्या या प्रवासात केवळ दगड-विटांच्या इमारती उभ्या राहिल्या नाहीत, तर हजारो ग्रामीण तरुणांच्या आकांक्षांना हक्काचे घर मिळाले आहे.

भविष्यात आरोग्य सेवा आणि आधुनिक संशोधनाच्या क्षेत्रात पाऊल टाकतानाही त्यांची हीच संवेदनशीलता आणि जिद्द कायम राहील, यात शंका नाही. विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील स्वप्नांना प्रत्यक्षात उतरवणारा हा पवित्र ज्ञानयज्ञ असाच तेवत राहो.

महाराष्ट्राच्या शैक्षणिक नकाशावर शिवाजी शैक्षणिक प्रतिष्ठानचे नाव केवळ एक संस्था म्हणून नाही, तर 'आशेचा किरण' म्हणून सदैव तळपत राहावे, हीच सदिच्छा! मुकेश पाटील टाकळीकर यांच्या या ध्येयवेड्या प्रवासाला आणि त्यांच्या नवनवीन संकल्पांना यशाची अनेक शिखरे सर करता येवोत, हीच सदिच्छा आणि अनंत शुभेच्छा!

----------------

**मुकेश पाटील टाकळीकर**
**संपर्क क्रमांक 8308898888**

■ ■ ■

# लिव्ह -इन रिलेशनशिप अयोग्य

**वाचक लिहितात**

समाज स्वास्थ टिकून राहण्यासाठी आदर्श कुटुंब व्यवस्था असणे अगत्याचे असते. कुटुंबसंस्थेचा पाया विवाह संस्कार हा आहे. सात पावले एकत्र चालल्याने मैत्री होतेअसे शास्त्र वचन आहे. म्हणून विवाह संस्कारात सप्तपदीला फार महत्त्व आहे. मुलगी जेव्हा सासरी जाते तेव्हा तिला सासरच्या चालीरीती,परंपरा, कुटुंबातील व्यक्तींचे स्वभाव यांच्याशी जुळवून घ्यावे लागते. नैतिकता, मानसीकता, अध्यात्मिक दृष्टिकोन हा विवाह संस्काराचा पाया आहे.

नुकत्याच घडलेल्या एका घटनेत एका युवकाने एका तरुणीला विवाहचे आमीष दाखवून पळवून नेले आणि तिच्याशी शरीर संबंध ठेवले परंतु ती गर्भवती झाल्यावर तिला घराबाहेर काढले . अशा घटना वारंवार समोर येत आहेत या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्याची ताकद प्रचलित कायद्यांमध्ये नाही. न्यायसंस्थेनेही या समस्येचा गांभीयार्ने विचार करायला हवा असे वाटते. 'यूज अँन्ड थ्रो ' असे लव-इन रीलेशनशीपचे स्वरूप आहे. यामुळे स्वैराचाराला प्रोत्साहन मिळते आहे. यामुळे धर्मशिक्षण, धर्मपालन आणि धर्मरक्षण यांची नितांत आवश्यकता आहे असे लक्षात येते.

■ **श्रीमती संध्या काटदरे**

# अमृतासारखे का मानले जाते पेरूला सुपरफूड



पेरू हे केवळ एक स्वादिष्ट फळ नाही तर व्हिटॅमिन सी, फायबर आणि अँटिऑक्सिडंट्सचा खजिना देखील आहे. आयुर्वेदात अमृतफळ मानले जाणारे हे फळ रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी संत्र्यांपेक्षा जास्त प्रभावी आहे.

ते पचनसंस्था सुधारते आणि बद्धकोष्ठता दूर करते आणि त्याचा कमी ग्लायसेमिक इंडेक्स मधुमेहाच्या रुग्णांसाठी वरदान आहे. पेरू हे आयुर्वेदात अमृतफळ म्हणून ओळखले जाणारे एक सुपरफूड आहे. त्यात असलेले व्हिटॅमिन सी, आहारातील फायबर आणि अँटिऑक्सिडंट्स एकूण आरोग्यासाठी फायदेशीर आहेत.

**रोगप्रतिकारक शक्ती वाढवते:** पेरूमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. त्यात संत्र्यांपेक्षा जास्त व्हिटॅमिन सी असते आणि ते रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते, ज्यामुळे शरीराला संसर्ग आणि सदीर्शी लढण्यास मदत होते.

**पचन सुधारते:** तज्ञांच्या मते, पेरूमध्ये भरपूर प्रमाणात आहारातील फायबर असते जे पचनास मदत करते, बद्धकोष्ठता प्रतिबंधित करते आणि नियमित आतड्यांची हालचाल करण्यास प्रोत्साहन देते.

**रक्तातील साखर नियंत्रित करते:** पेरूमध्ये ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो आणि तो रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करतो, ज्यामुळे ते मधुमेहींसाठी एक उत्तम फळ बनते. ज्यांना त्यांच्या रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करायची आहे त्यांच्यासाठी देखील हे एक उत्तम पर्याय आहे.

**हृदयाचे आरोग्य सुधारते:** पेरूमध्ये अँटीऑक्सिडंट्स, पोटॅशियम आणि विरघळणारे फायबर भरपूर प्रमाणात असते, जे खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यास आणि निरोगी रक्तदाब पातळी राखण्यास मदत करते.

**त्वचेसाठी फायदेशीर:** पेरूमधील व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स मुक्त रॅडिकल्सशी लढण्यास, मुरुम कमी करण्यास आणि स्वच्छ, तरुण त्वचेसाठी कोलेजन उत्पादन वाढविण्यास मदत करतात.

काही पिकलेले पेरू धुवून सालासह खा. पचन आणि पोषक तत्वांसाठी जेवणाच्या दरम्यान ते हळूहळू चावा. बिया चघळल्याने पचन सुधारते. एवढंच नाही तर, डॉक्टर देखील पेरू खाण्याचा सल्ला देतात. याच कारणांमुळे पेरूला सुपरफूड मानलं जात. पण काही आरोग्यासंबंधी समस्या असतील तर,डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्या.

■ ■ ■

**अशोकायन**

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



# यशस्वी भव

प्रारंभ झाला परीक्षोत्सवाला
आनंदाने जावे स्वागताला
कर्मयोगीचे व्हा पुरस्कर्ते
यश हमखास पदरी पडते..

यशश्वी भव ही असे
शुभेच्छेची परंपरा
पण आधी कष्ट मग फळ
हाच सापडे बोध खरा ..

वेळेचे काम वेळेवर करी
त्याला टेन्शन नसे शिरी
यश हमखास येते पदरी
भविष्यकाराची
काय जरूरी?

# राळेगाव तालुक्यातील पांदण रस्ते मोकळे होणार

■ महासागर प्रतिनिधी
राळेगाव, दि. ९ :

ग्रामीण भागात शेतीत शेती करणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. शेतात जाण्या-येण्यासाठी योग्य रस्ता नसल्याने अनेक शेतकरी शेती पडीत ठेवत होते. आता मात्र शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात जाण्याकरिता हक्काचा रस्ता मिळणार आहे. मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ता योजना अधिक प्रभावी होण्याकरिता क्षत्रिय समिती गठित करण्यात आली आहे. याबाबत राळेगाव उपविभागीय अधिकारी कार्यालयात समन्वय सभा झाली. या सभेत राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी या योजनेची सविस्तर माहिती दिली. शेतकऱ्यांना शेतात जाण्याचा हक्काचा रस्ता नव्हता.



अनेकांच्या शेतातून पायवाट करून शेतात जावे लागते. अशावेळी आजूबाजूच्या शेतकऱ्यांशी भांडण-तंटे होऊन गावात तणावाचे वातावरण होत होते. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांची पांदण रस्ता मिळण्याची मागणी होती.

## मुख्यमंत्री बळीराजा शेतपांदण रस्ते योजना लागू

या पार्श्वभूमीवर 14 डिसेंबर 2025 रोजी रोजी शासनाने आदेश निर्गमित केला असून आता शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात जाण्याकरिता हक्काचा रस्ता मिळणार आहे. या योजनेची संपूर्ण पार्श्वभूमी मंत्री डॉ. अशोक उईके यांनी अधिकाऱ्यांना समजावून सांगितली. राळेगाव मतदारसंघातील सर्व तालुक्यांतील अधिकाऱ्यांची सभा घेऊन क्षेत्रीय समिती गठित करण्यात आली आहे. या समितीचे अध्यक्ष स्वतः डॉ. मंत्री अशोक उईके असून सदस्य सचिव उपविभागीय अधिकारी आहेत. तर गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, भूमी अभिलेख अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग अभियंता व ठाणेदार या समितीचे सदस्य आहेत.

मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ते योजना प्रभावीरित्या राबविल्यानंतर शेतकऱ्यांना पेरणी, आंतरमशागत, कापणी, मळणी, शेतमाल बाजारात घेऊन जाणे अशा प्रकारच्या सुविधा सहज उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे ही योजना अधिक प्रभावी राबविण्याकरिता भूमी अभिलेख अधिकारी कार्यालयातून पांदण रस्त्याची पाहणी करून मोफत मोजणी करून सीमांकन केले जाणार आहे. काही ठिकाणी अतिक्रमण असतील तर ते पोलिस बंदोबस्तात काढले जातील.

# कार्यक्रमातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो : खा. धोत्रे



■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ९ :

वाशीम बायपासवरील खेंडकर विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम पार पडला. सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन खासदार अनुप धोत्रे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये स्टेज डेरिंग वाढण्यात सांस्कृतिक कार्यक्रमाची महत्त्वाची भूमिका असते, असे प्रतिपादन खा. धोत्रे यांनी याप्रसंगी केले.

प्रमुख अतिथी म्हणून नवनियुक्त उपमहापौर अमोल गोगे होते. अध्यक्षस्थानी विष्णुपंत खेंडकर विद्यालयाचे मुख्याध्यापक नीलेश खेंडकर तर स्व. यमुनाबाई खेंडकर प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अलकेश खेंडकर, मनीष गावंडे, किशोर शिंदे, कोषाध्यक्ष मृणालिनी खेंडकर व उपाध्यक्ष अस्मिता खेंडकर उपस्थित होते.

महिला पालकांसाठी उखाणे स्पर्धा, संगीत खुर्ची व फॅन्सी ड्रेस स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सूत्रसंचालन उषा जगदाळे यांनी केले. आभार आशा हिवरकर यांनी मानले. सूत्र संचालन आठवी, नववी व दहावीच्या विद्यार्थिनी नव्या मोहाडी व अनुष्का सोळंके, रिद्धी लामने, साक्षी बामनकर यांनी पार पाडले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी शिक्षक कांचन वानखडे, सुरेश सुरत्ने, प्रज्ञानंद थोरात, श्रीकांत पागृत, गोपाल वानखडे, प्रशांत काळे, अश्विनी सोळंके, अंजू मुंढे, मीना घाटोळे, सुकेशनी ओहेकर, छाया इंगळे, वर्षा मते, वर्षा खेडकर, संगीता कोंढाणे, माया खोडके, प्रणाली धोटे, मेघा शर्मा व शिक्षकेत्तर कर्मचारी संतोष कदम यांचे सहकार्य मिळाले. तायक्वांदो स्पर्धेमध्ये विभागीय स्तरावर कांस्य पदक प्राप्त करणारा लकी रवींद्र इंगळे तसेच अंश कांबळे, अपेक्स ब्रेन अबॅकस इन्स्टिट्यूट पुणेतर्फे घेण्यात आलेल्या बाराव्या नॅशनल लेव्हल अबॅकस स्पर्धेमध्ये प्रथम आलेली मानसी चंदन खंडारे आदी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# ३७ कैद्यांनी दिली गांधी विचार परीक्षा



■ महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. ९ :

सत्य आणि अहिंसेचा मंत्र जपणाऱ्या गांधीजींच्या जीवनाचे धडे गिरविण्याचा संकल्प करीत आज वर्धा मध्यवर्ती कारागृहातील ३७ कैद्यांनी गांधी विचार परीक्षेत आपला सहभाग नोंदविला. सहयोग ट्रस्ट नागपूर, मुंबई सर्वोदय मंडळ, मुंबई आणि वर्धा मध्यवर्ती कारागृह यांच्या संयुक्त विद्यमाने सहयोग ट्रस्टचे विश्वस्त आणि गांधी विचार परीक्षेचे विदर्भ विभागीय संयोजक डॉ. रवींद्र भुसारी यांच्या संयोजनात आणि वर्धा कारागृह अधीक्षक संजय गुल्हाने आणि तुरुंगाधिकारी सुहास नागमोते यांच्या मार्गदर्शनात ही परीक्षा पार पडली. परीक्षार्थीमध्ये न्यायाधीन बंदी आणि शिक्षा बंदी दोहोंचाही समावेश होता. सर्व सहभागी कैद्यांना प्रमाणपत्र तर उत्तीर्ण झालेल्यांना पुरस्कार देण्यात येणार आहेत.

परीक्षेच्या यशस्वीतेसाठी वर्धा कारागृहातील संजय वंजारी, संदीप देशमुख, ध्रुवास पठाडे, उत्तम पटले या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. गांधीजींच्या जीवनावरील गांधी बापू, माझी जीवनकथा, संक्षिप्त आत्मकथा ही पुस्तके कारागृहातील कैद्यांना हिंदी आणि मराठी अशा दोन्ही भाषांमध्ये अभ्यासासाठी मुंबई सर्वोदय मंडळातर्फे मोफत पुरविण्यात आली होती.

त्यावरून ८० गुणांची प्रश्नपत्रिका कैद्यांनी सोडविली. यापूर्वी नागपूर मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांनीही गांधी विचार परीक्षा दिल्याचे विदर्भ संयोजक डॉ. रवींद्र भुसारी यांनी सांगितले.

# ट्रक उलटल्याने दोघे जागीच ठार

■ महासागर प्रतिनिधी
मूर्तिजापूर, दि. ९ :

तालुक्यातील माना पोलिस ठाण्यांतर्गत राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ वर कुरूम शिवारातील तीन पुलाजवळ शनिवारी (दि.७) रात्रीच्या सुमारास आयशर ट्रक अनियंत्रित होऊन रोडच्या खाली गेल्याने झालेल्या अपघातात ट्रक चालक व सहाय्यकांचा जागीच मृत्यू झाला. माहितीनुसार नागपूर येथून संभाजीनगरकडे लोखंडी पाइप घेऊन आयशर ट्रक (क्र. एम. एच.-२९ - बीएफ - ६०७४) जात होता. हा ट्रक कुरुम जवळ मध्यरात्रीनंतरच्या सुमारास आला असता चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटले. यामुळे हा ट्रक दुभाजक ओलांडून विरुद्ध दिशेने पुलाजवळील खोल दरीत जाऊन पडला.

# एमआयडीसीतील १४० एकर जागेवर होणार आयटी पार्क

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ९ :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या वर्षी बेलोरा विमानतळाच्या उद्घाटन प्रसंगी अमरावतीला आयटी पार्क देणार असल्याची घोषणा केली होती. यासंदर्भात एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातुरकर यांचाही सातत्याने पाठपुरावा सुरू होता. त्यांनी वडगाव माहोरे येथे २५ एकर जागेची मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली होती. परंतु, आयटी पार्क एवढ्या कमी जागेवर उभारता येणार नसल्यामुळे नांदगाव पेठ एमआयडीसीत ७० हेक्टर (सुमारे १४० एकर) जागा देण्याचे पत्र राज्याचे उद्योग सचिव अनबल्गन यांनी २२ डिसेंबर रोजी एमआयडीसीला पाठवले असून त्यानुसार कामही सुरू झाले आहे. त्यामुळे मुंबई, पुणे, बेंगळुरू, हैदराबादसारख्या महानगरांकडे जाणाऱ्या अमरावतीच्या शेकडो युवकांना शहरातच रोजगार उपलब्ध होणार आहे.

आयटी पार्क सुरू झाल्यानंतर अमरावती जिल्ह्यातील युवकांना रोजगाराची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. स्मार्ट बिल्डिंग, ऑटोमेशन बीएमएस आणि एआय आधारित सीसीटीव्ही निगराणी, स्मार्ट पार्किंग तसेच वाहतूक नियोजन राहणार आहे.

येथे असे कार्यालय सुरू केले जातील जेथे प्लग अ‍ॅण्ड प्ले, रेडी टू युज ऑफिस स्पेस, व्हीडिओ कॉन्फरन्स आणि इनोव्हेशन लॅब राहील. सोबतच स्टार्टअपसाठीही सुविधा राहतील. भविष्याच्या दृष्टीने येथे तयारी केली जात आहे. फाईव्ह जी आणि एज कम्प्युटिंग रेडी ईव्ही चार्जिंग स्टेशन, आपातकालिन यंत्रणा राहणार आहे. यामुळे शहरातील सुशिक्षत, आयटी क्षेत्रात काम करण्यास इच्छुक तसेच इतर महानगरांमध्ये आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या जिल्ह्यातील युवक, नोकरीपेक्षा नागरिकांना शहरातच उत्तम संधी मिळेल, अशी माहितीही एमआयडीसी इंडस्ट्रियल असोसिएशनच्या अध्यक्षांनी दिली.

मुख्यमंत्र्यांनी नांदगाव पेठ एमआयडीसीत आयटी पार्क उभारण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आयटी उद्योगांना आमंत्रित करावे लागणार असून त्यासाठी त्यांना उत्तम सुविधाही द्याव्या लागतील, असेही ते पुढे म्हणाले.

यात डिजिटल कनेक्टिव्हीटी, १ जीबीपीएस ते १० जीबीपीएस स्केलचे इंटरनेट, वायफाय-६ , ६ ई रेडी कॅम्पस, मोठ्या प्रमाणात विद्युत व्यवस्था व पॉवर बॅकअपसाठी ६६ केव्ही उपकेंद्र, डेटा केंद्र, क्लाऊड रेडी सुविधा, सुरक्षित सर्व्हर कक्ष, रिकव्हरी, बिझनेस कनेक्टीव्हीटी प्लानिंग तसेच सायबर सुरक्षेशी संबंधित सर्वच उपकरणे, यंत्रणा राहणार आहे.

# संत गजानन महाराज प्रकटदिनी पाच हजार भाविकांसाठी महाप्रसाद

■ महासागर प्रतिनिधी
साखरखेर्डा, दि. ९ :

साखरखेर्डा येथे संत गजानन महाराज प्रकट दिन उत्सव टाळ मृदंगाच्या निनादात साजरा करण्यात आला. स्व भास्करराव शिंगणे कला प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालयात सकाळी प्रा. डॉ. बाळासाहेब गावंडे, नगरसेविका प्रा. डॉ. मीनल गावंडे, नेहरू युवा क्रिडा व सांस्कृतीक मंडळाच्या संचालिका इशा नीलेश गावंडे, क्रिश नीलेश गावंडे यांच्या हस्ते पूजा झाली. जवळपास पाच हजार भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आले.



रांगेत प्रसाद घेणाऱ्या प्रत्येक भाविकांचा रुमाल टोपी देऊन सत्कार केला. पाच क्विंटल गहू, एक ते दोन क्विंटल वांग्याच्या भाजीचा दरवर्षी गावंडे दाम्पत्याच्या वतीने महाप्रसाद तयार करण्यात येतो. महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर गेल्या १८ वर्षांपूर्वी डॉ गावंडे यांनी संत गजानन महाराजांचे प्रशस्त मंदिर उभारले आहे. साखरखेर्ड्यात खालचे बसस्टॉपवर संत गजानन महाराज प्रकटदिनानिमित्त सप्ताह आयोजित करण्यात आला होता. काल्याच्या कीर्तनाने या सप्ताहाची सांगता झाली. दरम्यान साखरखेर्डा येथे भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आले.

# वाढत्या कलहात सामाजिक जाणीव जपावी : डॉ. अर्चना देठे

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. ९ :

जागतिकीकरणाच्या वाटचालीत वाढत्या लोकसंख्येमुळे बेकारी सोबतच गुन्हेगारी फोफावत आहे. त्यातच आर्थिक, शारीरिक, मानसिक व सामाजिक कलह सदृष्य वातावरणात आणि सामान्यांची जगण्यासाठी होणारी ससेहोलपट थांबवण्यासाठी मानसिक संतुलन स्थिर ठेवणे क्रमप्राप्त झाले आहे. म्हणूनच समाजाच्या सर्वांगीण विकासाकरीता जनसामान्यांनी मनोसामाजिक जाणीवेची कास धरावी' असे परखड वक्तव्य तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अर्चना देठे यांनी येथे केले.



त्या मारेगाव येथील ग्रामीण रुणालयात आयोजित मोफत आरोग्यनिदान व उपचार शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी अध्यक्ष म्हणून बोलत होत्या. त्या पुढे म्हणाल्या की, मानवाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या विवधावस्थेत उत्पन्न होणाऱ्या विविध समस्यांवर वैज्ञानिक दृष्टीकोणातून तोडगा काढणे आवश्यक आहे. त्यासाठी जनतेने संतुलनाची भूमिका वठवावी. प्रस्तूत कार्यक्रम जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम प्रेरणा प्रकल्पाद्वारे आयोजित करण्यात आला होता. डॉ. संजय मडावी, डॉ. बोधी जुनगरी यांची देखील यावेळी उपस्थिती होती.

सदर शिबिरात १२९ रुग्णांची तपासणी करुन त्यांच्यावर उपचार व समुपदेशन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितिन कांबळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री इंगोले यांनी तर राजरत्न भालेराव यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. विकास कांबळे, डॉ. अब्दुल्ला शेख, नंदकिशोर देऊळकर, प्रज्ञा भगत, धीरज चांदणे, रोशन मानकर, पवन दुधे, जयश्री तिडके यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

मानसिक आरोग्य, समस्या व निवारण जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुखदेव राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुभाष ढोले, यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली राबवण्यात येत असून, मारेगाव येथील कार्यक्रमाप्रसंगी मानसोपचार तज्ज्ञ डॉ. गणेश इंगोले यांनी मानसिक आरोग्याच्या विविध समस्या व त्याचे निवारण यावर मार्गदर्शन करताना मानवी उदासीनतेवर प्रामुख्याने व्यसनाधीनतेमुळे स्क्रीझोफेनिया, हिस्टेरिया, पॅनिकडिसऑर्डर, ओव्हेसीव्ह कम्पलसीव्ह डिसऑर्डर यावर प्रकाश टाकला.


## जाहीर सुचना

सुचित करण्यात येते की माझा मुलगा **पवन सुखदेव पौंनिकर** याचे दि. ३०/०८/२०२५ रोजी निधन झाले. त्याच्या नावे खालील वर्णित वाहन आहे :- Good Carrier Tanker - Ashok Layland 1616/L, RTO Reg. No. MH40 Y9991, Chassis No. MB1A3DYCXDPVH 7928, Engine No. DVPZ112563, Model 2013. मी **सुखदेव किसनुजी पौंनीकर (वडील)**, त्याचा कायदेशीर वारस असून वरील वर्णित गाडी माझे नावे करण्यात येत असून याला कोणाचीही कुठलीही हरकत किंवा आक्षेप असल्यास ७ **दिवसाचे आत** खालील पत्त्यावर संपर्क साधावा. मुदतीनंतर कुठलाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

नागपूर - दि. १०/०२/२०२६

**श्री सुखदेव किसनुजी पौंनिकर**
रा.प्लॉट नं.७५२, जुनी मंगळवारी गुजरी चौक बगडगंज, नागपुर. मो. 72760 60307



## Change Of Name

MY OLD NAME WAS **MAJJT ABDUL CHHAWARE.** NOW MY NEW NAME IS **MAJID ABDUL CHHAWARE.**
**ADD:** PLOT NO. 75 JIBKATE LAYOUT ASHRAF NAGAR WANJRA NAGPUR 440026

MY OLD NAME WAS **SHEIKH SANA MOHAMMED NAYEEM.** NOW MY NEW NAME IS **SANA AFREEN MOHAMMAD NAYEEM.**
**ADD:** HASANBAG NAGPUR 440009

MY OLD NAME WAS **TASNEEM KAOSAR.** NOW MY NEW NAME IS **KAUSER BANO.**
**ADD:** PLOT NO. 23, ABDUL HAMID NAGAR, GOREWADA, NAGPUR 440013

MY OLD NAME WAS **SHANUR BANO MOHAMMAD SHAFI.** NOW MY NEW NAME IS **SHANUR PARVEEN SHEKH BASHIR.**
**ADD:** DAYLI AMMAA DARGAH, 4200 BADA TAJBAG UMREDNROAD NAGPUR-440024

MY OLD NAME WAS **ROSHAN ARA.** NOW MY NEW NAME IS **ROSHAN ARA M YUNUS KHANANI.**
**ADD:** KIDWAI WARD DESAIGANJ VADASA GADCHIROLI 441207

MY OLD NAME WAS **SANTOSHKUMAR RANGLANI.** NOW MY NEW NAME IS **SANTOSH RANGLANI.**
**ADD:** BLOCK NO 58/A NEAR T-POINT BARA KHOLI JARIPATKA NAGPUR 440014

MY OLD PASSPORT NO. **M9825485.** MY OLD NAME WAS **ISHITA CHOWDHURY.** NOW MY NEW NAME IS **ISHITA ABHISHEK DHAR.**
**ADD:** TYPE 5/2/3 KTPS, COLONY KORADI NAGPUR - 441111.

MY OLD NAME WAS **DAYA.** NOW MY NEW NAME IS **KIRAN SURESH BHAGTANI.**
**ADD:** PLOT NO. 5, NARA RING ROAD NEAR SAI MANDIR KUSHI NAGAR NAGPUR - 440014.

MY OLD NAME WAS **ABDULLAH ABDUL RAUF.** NOW MY NEW NAME IS **ABDULLAH ANSARI ABDUL RAUF.**
**ADD:** NEAR ANSAR NAGAR MOMINPURA NAGPUR -440018.

MY OLD NAME WAS **MOHMAD ILYAS MOHMAD SULTAN.** NOW MY NEW NAME IS **MOHD SULTAN MOHD ILYAS.**
**ADD:** MAKAN NO.34,WARD NO. 01, DHULGHAT RAILWAY, DHARNI,AMRAVATI - 444719.

MY OLD NAME WAS **AFREEN QURESHI.** NOW MY NEW NAME IS **HAMEEDA AFREEN SABIR.**
**ADD:** PLOT NO.4,UTKARSH SOCIETY,BEHIND CHOPRA LAWN,AWASTHI NAGAR,NAGPUR - 440013.

MY OLD NAME WAS **RITIKA PINCHA.** NOW MY NEW NAME IS **RADHIKA PINCHA.**
**ADD:** ORCHID RAMA KESHAV FLAT NO. 302 PLOT NO. G-2 KHARE TOWN DHARAMPETH NAGPUR MAHARASHTRA - 440010.

MY OLD NAME WAS **SHABANA ANJUM ANSARI.** NOW MY NEW NAME IS **SHABANA ANJUM .**
**ADD:** NEAR LAL MADRASA CHOWK, WARIS PURA, KAMPTEE 441002.

MY OLD NAME WAS **MOHD MUDASSAR HABEEBUR RAHMAN/ MOHAMMAD MUDASSAR HABEEBUR REHMAN.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD MUDASSAR.**
**ADD:** BEHIND MASJID WARIS PURA, WARIS PURA, KAMPTEE 441002.

MY OLD NAME WAS **MOHAMMED ASHFAQ KARAWALLA.** NOW MY NEW NAME IS **ASHFAQ YUSUF KARAWALA.**
**ADD:** FLAT NO 301,MAHEK APARTMENT,ABOVE BOMBAY COLLECTION ,DR.MANSHA CHOWK,KATOL ROAD NAGPUR-440013.

MY OLD NAME WAS **TEHMINA MOHAMMED ASHFAQ KARAWALLA.** NOW MY NEW NAME IS **TEHMINA ASHFAQ KARAWALA.**
**ADD:** FLAT NO 301,MAHEK APARTMENT,ABOVE BOMBAY COLLECTION ,DR.MANSHA CHOWK,KATOL ROAD NAGPUR-440013.

MY OLD NAME WAS **KHAN NARGISHBANO FAIJU RAHEMAN.** NOW MY NEW NAME IS **NARGIS FAIJURAHIMAN KHAN.**
**ADD:** GANDHI WARD DEWHADI TAHSIL TUMSAR, DIST. BHANDARA 441913


# अपयश हीच यशाची खरी पायरी : प्रा. मनोज भगत

■ महासागर प्रतिनिधी
दिग्रस, दि. ९ :

दिग्रस बापूरावजी बुटले कला, नारायणराव भट वाणिज्य व बापूसाहेब पाटील विज्ञान महाविद्यालयात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी ६ फेब्रुवारीपासून चार दिवसीय कौशल्य विकास कार्यशाळेला उत्साहात सुरुवात झाली आहे. यावेळी इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. मनोज भगत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की, अपयश हीच यशाची खरी पायरी असते. थॉमस अल्वा एडिसन, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील संघर्षाचा सामना करावा लागला होता.

त्या नंतर जेखील त्यांनी अपयशाला न जुमानता धैर्य आणि चिकाटीने सातत्य ठेवत सर्वोच्च यशाला गवसणी घातली असल्याचे प्रा. भगत म्हणाले.

कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. अध्यक्षस्थानी भौतिकशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. व्ही. के. जाधव होते. यावेळी पुढे बोलतांना प्रा. डॉ. भगत यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना थॉमस अल्वा एडिसन, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील संघर्षाचा आणि यशाची उदाहरणे विद्यार्थ्यांसमोर ठेवली.


**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११७५

क.स.म.अ./तह.नाग.शहर/कावि-२०८७/२०२५ दिनांक : २७/११/२०२५

वाचा : १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. प्रमिला मनोहर सोनवरसे, रा. गणेश नगर, नागपूर यांचा अर्ज दिनांक २१/११/२०२५

-: जाहीरनामा :-

ज्याअर्थी अर्जदार प्रमिला मनोहर सोनबरसे, रा. गणेश नगर, नागपूर यांनी त्यांच्या स्वतःचे जन्म तारखेची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार प्रमिला मनोहर सोनबरसे, रा. गणेश नगर, नागपूर यांचा जन्म दिनांक १५/०७/१९७३ रोजी त्यांच्या राहते घरी, गणेश नगर, नागपूर येथे झालेला आहे. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्मबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यासा त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

**कोर्ट विद्यमान विकास बिक्कड, तहसीलदार तथा कार्यकारी अधिकारी, कळमेश्वर यांचे न्यायालय**
रा.मा.क्र.७६/एम.आर.सी-८१/२०२५-२६
मौजा : बेल्लोरी
तालुका : कळमेश्वर

वाचा :- १) जन्म - मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम-१३, २) जन्म-मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ चा २०, ३) भारत सरकार विधीवन्याय विभाग यांचे कडील दि.११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र, ४) मा. जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांचे कडील आदेश क्र.अ.का/डी-१/जन्म-मृत्यू-आदेश/कावि-५३५/२०२३, दि.१५/१०/२०२३, ५) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क. जमूनों २०२५/(ई.ओ.९९११८१)/प्र.क. २२/कु. क. नविन मंत्रालय, मुंबई दिनांक १२ मार्च २०२५, ६) श्रीमती. शिवकली राजु टेकाम, रा. बेल्लोरी धापेवाडा ता. कळमेश्वर, जि. नागपुर यांचा अर्ज दि. ०५/०१/२०२६

-: जाहीरनामा :-

ज्याअर्थी अर्जदार श्रीमती. शिवकली राजु टेकाम, रा. बेल्लोरी धापेवाडा, ता. कळमेश्वर, जि. नागपूर यांनी त्यांचे स्वतःचे/नाते संबंधातील व्यक्तिच्या जन्माची नोंद नगर परिषद ग्रामपंचायत तोंडाखेरी, ता. कळमेश्वर दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणे कामी अर्ज दाखल केला आहे. सदरहू स्वतःचे/नाते संबंधातील व्यक्ती नामे आराध्या दिपक टेकाम यांचा जन्म दिनांक १६/०२/२०२४ रोजी राहते गावी झाला असा अर्जदारांचा दावा आहे. त्याच प्रमाणे अर्जदारयांना त्यांचे जन्म प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे असल्याबाबत आवश्यक त्यांनी अर्जातनमूद केले आहे.

त्याअर्थी, मी कार्यकारी दंडाधिकारी, कळमेश्वर उपरोक्त वाचा क्र.१ आणि २ नुसार व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्म बाबत नोंद घेणे कामी चा आदेश देणे करिता व गृह चौकशी करणे कामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य तो पुरावा किंवा साक्षीदारांसह कार्यकारी दंडाधिकारी, कळमेश्वर यांचे न्यायालयात स्वःत जातीने / वकीला मार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामा प्रसिद्ध दिनांका पासून एक महिन्याचे आत सादर करावे. उक्त कालावधीत कुठलाही आक्षेप/उजर/विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्म बाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणे बाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदी बाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

दि. ०९/०२/२०२६
स्थळ : कळमेश्वर

(विकास बिक्कड)
तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, कळमेश्वर

**कोर्ट विद्यमान विकास बिक्कड, तहसीलदार तथा कार्यकारी अधिकारी, कळमेश्वर यांचे न्यायालय**
रा.मा.क्र.७७/एम.आर.सी-८१/२०२५-२६
मौजा : तोंडाखैरी
तालुका : कळमेश्वर

वाचा :- १) जन्म - मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम-१३, २) जन्म-मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ चा २०, ३) भारत सरकार विधीवन्याय विभाग यांचे कडील दि.११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र, ४) मा. जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांचे कडील आदेश क्र.अ.का/डी-१/जन्म-मृत्यू-आदेश/कावि-५३५/२०२३, दि.१५/१०/२०२३, ५) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क. जमूनों २०२५/(ई.ओ.९९११८१)/प्र.क. २२/कु. क. नविन मंत्रालय, मुंबई दिनांक १२ मार्च २०२५, ६) श्रीमती. शिवकली राजु टेकाम, रा. बेल्लोरी धापेवाडा ता. कळमेश्वर, जि. नागपुर यांचा अर्ज दि. ०५/०१/२०२६

-: जाहीरनामा :-

ज्याअर्थी अर्जदार श्रीमती. मंगला लिलाधर बोराटे, रा. तोंडाखैरी धापेवाडा ता. कळमेश्वर, जि. नागपुर यांनी त्यांचे स्वतःचे / नाते संबंधातील व्यक्तीच्या जन्मची नोंद नगर परिषद/ग्रामपंचायत सोनपुर (आदासा) ता. कळमेश्वर दप्तरी घेणे करिता निर्देशित करणे कामी अर्ज दाखल केला आहे. सदरहू स्वतःचे / नाते संबंधातील व्यक्ती नामे मंगला लिलाधर बोराटे यांचा जन्म दिनांक ०१/०७/१९७४ रोजी राहते गावी झाला असा अर्जदारांचा दावा आहे. त्याच प्रमाणे अर्जदारयांना त्यांचे जन्म प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे असल्याबाबत आवश्यक त्यांनी अर्जातनमूद केले आहे.

त्याअर्थी, मी कार्यकारी दंडाधिकारी, कळमेश्वर उपरोक्त वाचा क्र.१ आणि २ नुसार व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्म बाबत नोंद घेणे कामी चा आदेश देणे करिता व गृह चौकशी करणे कामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य तो पुरावा किंवा साक्षीदारांसह कार्यकारी दंडाधिकारी, कळमेश्वर यांचे न्यायालयात स्वःत जातीने / वकीला मार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामा प्रसिद्ध दिनांका पासून एक महिन्याचे आत सादर करावे. उक्त कालावधीत कुठलाही आक्षेप/उजर/विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्म बाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणे बाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदी बाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

दि. ०९/०२/२०२६
स्थळ : कळमेश्वर

(विकास बिक्कड)
तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, कळमेश्वर

**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११७५

क्र.म.सहा/प्रस्तु-२/तह.नाग (शहर)/कावि-७३/२०२५ दिनांक : ०६/०२/२०२६

वाचा : १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. हरीश हेमनदास घनवाणी रा. प्लॉट नं. १२६५, आंबेडकर गार्डन जवळ, वैशाली नगर, नागपूर यांचा अर्ज दिनांक १६/०१/२०२६

-: जाहीरनामा :-

ज्याअर्थी अर्जदार हरीश हेमनदास घनवाणी रा. प्लॉट नं. १२६५, आंबेडकर गार्डन जवळ, वैशाली नगर, नागपूर यांनी त्यांच्या स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार हरीश हेमनदास घनवाणी यांचा जन्म दिनांक ०६/०४/१९७९ रोजी मेडीकल कॉलेज अँन्ड हॉस्पीटल, नागपूर येथे झालेला आहे. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्मबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यासा त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता


RNINO-46975/1985 Mahasagar Amravati Printed published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no 9518934504 Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak

आर.एन. आय. नोंदणी क्र. ४६९७५/१९८५ महासागर अमरावती मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

# बँकिंगमध्ये करियर करायचे आहे?

रिझर्व्ह बँक देशभरातल्या बँकिंग क्षेत्रावर नियंत्रण ठेवते. या बँकेच्या देशभरात ३१ शाखा आहेत. स्पर्धा- परीक्षा आणि मुलाखतींच्या माध्यमातून उमेदवारांची निवड केली जाते. रिझर्व्ह बँकेच्या भरती प्रक्रियेविषयी जाणून घेऊ. प्राथमिक परीक्षा, मुख्य परीक्षा आणि लँग्वेज प्रोफिशिएन्सी टेस्ट म्हणजे एलपीटी असे टप्पे पार केल्यानंतर रिझर्व्ह बँकेच्या नोकरीची कवाडं खुली होतात. प्राथमिक परीक्षेत उमेदवारांना एक तासाचा वेळ दिला जातो. १०० गुणांच्या पेपरमध्ये १०० प्रश्न विचारले जातात. इंग्रजी भाषेशी संबंधित ३० तर न्यूमरिकल एबिलिटी आणि रिजनिंगशी संबंधित प्रत्येकी ३५ प्रश्न विचारले जातील. प्राथमिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर मुख्य परीक्षेला बसता येईल. मुख्य परीक्षेच्या पेपरसाठी उमेदवारांना दोन तास १५ मिनिटांचा कालावधी दिला जातो. मुख्य परीक्षेचा पेपर २०० गुणांचा असतो. २०० प्रश्न विचारले जातात. यात रिजनिंग, इंग्रजी भाषा, न्यूमरिकल अॅबिलिटी, जनरल अवेअरनेस, कॉम्प्युटर अशा विषयांवर आधारित प्रश्न विचारले जातात. मुख्य परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर एलपीटीचं आयोजन केलं जातं. या परीक्षेत उमेदवारांचं स्थानिक भाषेविषयीचं ज्ञान तपासलं जातं. एलपीटीचा टप्पा यशस्वीपणे पार केल्यानंतर वैद्यकीय तपासणी तसंच कागदपत्रांची पडताळणी करून उमेदवारांची निवड केली जाते.







## शेर की जुबानी

| शुरू करते हैं फिरसे मोहब्बत, तुम चले आओ... थोडा हम बदल जाते हैं, थोडा तुम बदल जाओ। | खामोशी की तह में छुपा लिजिए उलझनें। क्योंकी शोर कभी मुश्किले आसान नहीं करता। | सुकून से रहना चाहते हो तो वादे कम करो। |
|---|---|---|

# आईस्क्रीम सम्राट

अचिव्हर

वडिलांचा व्यवसाय दिवाळखोरीत निघाला तेव्हा तो फक्त १६ वर्षांचा होता. कुटुंबाला इतक्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागला, की त्याच्याकडे शाळेची फी भरण्यासाठीही पुरेसे पैसे नव्हते. त्याला शाळा सोडावी लागली आणि घरात अन्नाची समस्या निर्माण झाली. सर्व काही हळूहळू संपत चालले आहे, असे वाटत होते.

कुटुंबातील हा मुलगा उदरनिर्वाहासाठी छोटी-मोठी कामे करू लागला. त्याने लाकूड डेपोमध्ये काम करायला सुरुवात केली आणि फक्त ६५ रुपये कमवू लागला. कुटुंब कसे तरी उदरनिर्वाह करू शकले. वयाच्या २१ व्या वर्षी त्याला जाणवू लागले, की हे अत्यंत निराशेचे जीवन दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. त्यावेळी त्याने घेतलेल्या एका निर्णयाने केवळ त्याचेच नाही तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाचे जीवनच बदलून गेले. ही आरजी चंद्रमोगनची कहाणी आहे.


घरातील परिस्थितीने आरजी चंद्रमोगनला बळकट बनवले. त्याचा ६५ रुपयांचा पगार अपुरा पडला, तेव्हा त्याने गाडीतून कुल्फी विकायला सुरुवात केली. १९७० पर्यंत तो रस्त्यावरून कुल्फी विकत राहिला; परंतु त्याला समजले, की मोठे होण्यासाठी त्याला मोठी जोखीम पत्करावी लागेल. तामिळनाडूतील विरुधुनगर जिल्ह्यातील तिरुथंगल शहरात जन्मलेल्या चंद्रमोगनने आपली वडिलोपार्जित जमीन विकली आणि २५ चौरस मीटर जागा भाड्याने घेतली. त्याने चेन्नईतील रॉयलापूरममध्ये एक लहानसे दुकान उघडले. चंद्रमोगनने ३ लोकांना कामावर ठेवले. ६ सायकली खरेदी केल्या आणि आईस्क्रीम बनवायला सुरुवात केली. दोन वर्षे तो घरी गेला नाही, कारखान्यात काम करत होता आणि तिथेच झोपत होता. तो आईस्क्रीम बनवून सायकलवरून रस्त्यावर विकत होता.

सहा महिन्यांतच त्याने १५ आईस्क्रीम गाड्या खरेदी केल्या. पहिल्या वर्षातच त्याला १.५ लाख रुपयांचा महसूल मिळाला. चार वर्षांतच त्याची कंपनी अरुण आईस्क्रीम आजूबाजूच्या कॅन्टीन आणि बाजारपेठेतील ९५ टक्के बाजारपेठ काबीज केली. १९८६ मध्ये, त्याने कंपनीचे नाव बदलून 'हॅटसन अॅग्रो प्रॉडक्ट्स' असे ठेवले. त्याच्या आईस्क्रीमच्या चवीने आश्चर्यकारक काम केले आणि विक्री वाढली. त्याने शुद्ध दुधापासून बनवलेल्या त्याच्या आईस्क्रीमचा मोठ्या प्रमाणात प्रचार केला. पुनर्ब्रँडिंगने त्याला चालना दिली. त्याचा व्यवसाय चेन्नईपासून तामिळनाडू, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि गोवा या बाजारपेठांमध्ये विस्तारला. त्या काळात, त्याने दक्षिण भारतात स्वतःला स्थापित करणाऱ्या क्वालिटी आणि दशप्रकाशसारख्या ब्रँडच्या प्रतिष्ठेला धक्का दिला. त्याने तामिळनाडूच्या बाजारपेठेचा ९५ टक्के हिस्सा काबीज केला. २०२० मध्ये 'अरुण'ने ५,००० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवले आणि भारतातील सर्वात मोठा खासगी डेअरी ब्रँड बनला. आज त्याची एकूण संपत्ती १९,०७७ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

कंपनीचा व्यवसाय वाढत गेला, तसतसे त्याच्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढत गेली. आज कंपनी आठ हजार लोकांना रोजगार देते. कंपनीकडे आता एक हजारांहून अधिक विशेष अरुण आईस्क्रीम पार्लर आहेत. तमिळनाडू, कर्नाटक, केरळ, गोवा आणि आंध्र प्रदेशात त्याचे वर्चस्व आहे. २०२३ पर्यंत, अरुण आईस्क्रीमची मूळ कंपनी, हॅटसन अॅग्रो प्रॉडक्ट लिमिटेडची मार्केट कॅप २१,२०० कोटी रुपयांची होती.



## फिटनेस



### दूर करा या गैरसमजुती

व्यायामाशी संबंधित बरेच गैरसमज आहेत. हे गैरसमज दूर करण्याचा हा एक प्रयत्न...

□ वय वाढल्यावर फार व्यायाम करू नये, असं अनेकांना वाटतं. त्यामुळे काही लोक ठराविक काळानंतर व्यायाम थांबवतात. वय झाल्यामुळे वजन उचलता येणार नाही, फार शारीरिक श्रम करता येणार नाहीत, असाही समज असतो. प्रत्यक्षात हे चुकीचं आहे. व्यायामामुळे वय वाढण्याची प्रक्रिया मंदावू शकते. तसंच जीवनशैलीशी संबंधित बरेच आजार नियंत्रणात राहू शकतात किंवा त्यांना प्रतिबंध करता येतो. □ आजारपणात व्यायाम करू नये, असाही एक समज आहे. आजारी पडल्यावर शरीर दमतं, थकतं. पण अजिबात व्यायाम किंवा शारीरिक हालचाल करायची नाही असा याचा अर्थ होत नाही. अतिव्यायाम टाळणं गरजेचं आहे. पण थोड्या हालचालीमुळे तुम्ही लवकर बरे होऊ शकता. □ फिट राहण्यासाठी तासभर व्यायाम करणं गरजेचं आहे असंही अनेकांना वाटतं. पण प्रत्यक्षात काही मिनिटांचा व्यायामही तुम्हाला सगळे लाभ मिळवून देऊ शकतो. चालणं, धावणं, जिने चढणं अशा व्यायामांमुळेही तसंच घरातल्या कामांमुळेही तुमचा व्यायाम होऊ शकतो. □ कामानिमित्ताने चालणं किंवा धावपळ करणं व्यायामासारखंच आहे असं अनेकांना वाटतं. पण तीव्र स्वरुपाच्या व्यायामाच्या यापेक्षा अधिक कॅलरी खर्च होतात. अर्थात ही हालचालही शरीरासाठी गरजेची आहे. मात्र यासोबतच व्यायाम करणंही गरजेचं आहे. □ व्यायाम केल्यामुळे अंग दुखेल, दुखापत होईल, स्नायू दुखतील म्हणून बरेच जण व्यायाम टाळतात. पण व्यायामामुळे होणारे लाभ लक्षात घेतले तर व्यायामाला पर्याय नाही हेच खरं. योग्य पद्धतीने व्यायाम केल्यास अंगदुखी, स्नायूदुखी अशा समस्या जाणवणार नाही.

# व्हॉट्सअॅप वेबवरून करा कॉल

अॅप वर्ल्ड



व्हॉट्सअॅप आपल्या युजर्सचा अनुभव आणखी चांगला करण्यासाठी सतत नवनवीन प्रयोग करत आहे. या मालिकेतील पुढचे मोठे पाऊल म्हणजे व्हॉट्सअॅप वेब वरून ग्रुप व्हॉईस आणि व्हिडीओ कॉलिंगची सुविधा उपलब्ध करून देणे. आतापर्यंत ग्रुप कॉलिंगचे फीचर प्रामुख्याने मोबाईल पुरते मर्यादित होते, परंतु आता वेब ब्राउझरवर हे फिचर आल्यामुळे डेस्कटॉप किंवा लॅपटॉपवरून काम करणाऱ्या युजर्सना मोठा दिलासा मिळणार आहे. यामुळे मोठ्या स्क्रीनवर संवाद साधणे पूर्वीपेक्षा अधिक सुलभ आणि प्रभावी होईल.

या नवीन अपडेटमध्ये सर्वात महत्त्वाचे फीचर म्हणजे 'कॉल लिंक्स'. आपण झूम किंवा गुगल मीटवर मीटिंगची लिंक शेअर करतो त्याचप्रमाणे व्हॉट्सप वेबवरही कॉलची लिंक तयार करता येईल. ही लिंक कोणत्याही व्यक्तीला किंवा ग्रुपमध्ये पाठवून त्यांना कॉलमध्ये सामील होण्यासाठी आमंत्रित करता येईल. हे फीचर केवळ व्यक्तिगत संवादासाठीच नाही तर लहान व्यवसायिक मीटिंग्स किंवा कौटुंबिक संवादासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे कोणालाही सहजपणे कॉलला जोडले जाणे शक्य होईल.

कॉलिंगच्या अनुभवात आणखी एक भर टाकणारे फीचर म्हणजे 'कॉल शेड्युलिंग' या सुविधेमुळे वापरकर्ते विशिष्ट वेळी होणाऱ्या ग्रुप कॉल्सचे नियोजन आधीच करू शकतील. यामुळे नियोजित वेळी सर्व सहभागींना आपोआप सूचना मिळेल. त्यामुळे महत्त्वाच्या चर्चा किंवा बैठका चुकण्याची शक्यता कमी होईल. ऑफिसमधील कामाचे नियोजन करणाऱ्या लोकांसाठी हे एक अत्यंत महत्त्वाचे टूल ठरेल.

# फोन हॅक झालाय?

बी केअरफुल




डिजिटल युगात इंटरनेट आणि स्मार्टफोन हे संपर्काचे नवीन आयुध बनले आहे. त्याचबरोबर सायबर भामट्यांचे जाळेसुद्धा वाढले आहे. सामान्यांना फसवण्यासाठी सायबर भामटे टपलेले असतात. त्यामुळे आमिष दाखवून हे लोकांना जाळ्यात अडकवतात, बँक खात्यातून रक्कम काढतात अथवा वैयक्तिक माहिती चोरतात आणि सार्वजनिक करण्याची भीती दाखवून ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न करतात. फोन हॅक झाल्यावर सर्वात अगोदर काय करायला हवे हे तुम्हाला माहिती आहे का?

**बँकेशी संपर्क साधा**

मोबाईल हॅक झाला असे लक्षात आले, तर सर्वप्रथम बँकेशी संपर्क साधा. तुमचे क्रेडिट कार्ड असलेल्या संस्थेशी संपर्क साधा. काही कालावधीसाठी त्याचा वापर थांबवण्याची विनंती करा.

**पासवर्ड बदला**

सर्वात महत्त्वाचं काम म्हणजे तुमच्या फोनशी जोडलेल्या सर्व साईट आणि इतर प्लॅटफॉर्मवरील पासवर्ड लगेच बदला. त्यामुळे तुमची माहिती सुरक्षित राहील.

**संशयित अॅप्स हटवा**

तुमच्या फोनमधील सर्व संशयित अॅप्स हटवा. तसेच व्हॉट्सअॅप, ई-मेल अथवा इतर प्लॅटफॉर्मवरील संशयित लिंक्स हटवा. फोन रिस्टार्ट करा. पुन्हा हे संशयित अॅप्स आहेत की नाही ते तपासा. जर असतील ते मोबाईल सेटिंगमधील अॅप्समधून हटवा.

**फोन फॅक्ट्री रिसेट करा**

तुम्हाला पॉप अप वा मालवेअर अॅप्स दिसत असतील, तर मात्र तुम्ही तातडीने फोन फॅक्ट्री रिसेट करा. अर्थात हा अखेरचा उपाय आहे. या प्रक्रियेमुळे फोनचा सर्व डेटा डिलिट होईल.

५. तुमच्या मित्रांना सांगा

मित्रांना आणि कॉन्टॅक्ट यादीतील परिचितांना फोन हॅक झाल्याची माहिती द्या.

६. सायबर सेलला तक्रार करा

फोन हॅक झाल्याचा तुमचा अंदाज असेल तर लगेच स्थानिक सायबर सेलकडे तक्रार करा.

## झटपट रेसिपी



### कुरकुरित ओनियन रिंग्ज

चहासोबत काहीतरी गरमागरम आणि चविष्ट खायचं असेल तर तुम्ही कुरकुरीत ओनियन रिंग्ज बनवू शकता.

साहित्य : एक कप मैदा, अर्धा चमचा मीठ, अर्धा चमचा बेकिंग पावडर, एक चमचा गार्लिक पावडर, एक चमचा मिरपूड, एक चमचा ऑरिगॅनो, एक चमचा ऑलिव्ह ऑईल, एक चमचा दूध, अर्धा कप पाणी, एका अंड्याचा पांढरा भाग, दोन कांदे आणि ब्रेड क्रम्स.

कृती : एका भांड्यात मैदा, बेकिंग पावडर, मिरपूड, गार्लिक पावडर, ऑरिगॅनो आणि मीठ घाला. आता यात ऑलिव्ह ऑईल आणि पाणी घाला. सर्व घटक नीट मिसळून घ्या. आता कांद्याचे गोलाकार काप करून घ्या. हे काप पंधरा मिनिटं बाजूला ठेवा. आता कांद्याचे काप मैद्याच्या मिश्रणात घोळवून घ्या. एका भांड्यात अंड्याचा पांढरा भाग फेटून घ्या. त्यात मीठ आणि मिरपूड घाला. आता मैद्याच्या मिश्रणातले कांदे अंड्यात घाला. या कांद्याच्या रिंग्ज एका थाळीत पसरवा. त्यावर ब्रेड क्रम्स भुरभुरा. यामुळे कांद्याच्या रिंग्ज मस्त कुरकुरीत होतील. आता एका कढईत तेल घाला. गरम झाल्यावर त्यात ओनियन रिंग्ज सोडा. सोनेरी रंगावर तळून घ्या. सॉससोबत खा.

# हेल्थ सायन्समधील विविध पदवी अभ्यासक्रम

उच्च शिक्षण

'एमआयटी-एडीटी' विद्यापीठाने 'अलाईड हेल्थ सायन्सेस'मधील पदवी अभ्यासक्रम राबवण्यासाठी 'अपोलो हेल्थकेअर अकादमी'सोबत सामंजस्य करार केला आहे. या करारामुळे विद्यापीठाच्या आधुनिक शैक्षणिक सुविधा आणि अपोलोच्या क्लिनिकल अनुभवाचा वापर करून अॅनेस्थेसिया आणि ऑपरेशन थिएटर टेक्नॉलॉजी, मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी, क्रिटिकल केअर टेक्नॉलॉजी यांसारख्या विषयांमध्ये पदवी अभ्यासक्रम सुरू होतील.

जागतिक आरोग्य संघटनेनुसार जगात अलाईड हेल्थ व्यावसायिकांची कमतरता आहे आणि वृद्ध लोकसंख्या वाढल्याने ही गरज अधिक वाढत आहे. या भागीदारीमुळे कुशल आणि तयार पदवीधर तयार होण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांना अत्याधुनिक प्रयोगशाळा, वर्गखोल्या, डिजिटल लर्निंग सिस्टम उपलब्ध असतील. यात हॉस्पिटल रोटेशन, अंतिम वर्षाची अनिवार्य इंटर्नशिप, ब्रिज प्रोग्राम्स, भाषा प्रशिक्षण आणि प्लेसमेंट सपोर्ट यांचा समावेश असेल.

अपोलो नॉलेजचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिवरामकृष्णन व्यंकटेश्वरन म्हणाले, अपोलो हेल्थकेअर अकादमी वर्गातील शिक्षण आणि रुग्णालयातील प्रत्यक्ष सराव यातील दरी भरून काढण्यासाठी वचनबद्ध आहे. ही भागीदारी विद्यार्थ्यांना भारतात आणि जागतिक स्तरावर यशस्वी होण्यासाठी आवश्यक आत्मविश्वास, एक्सपोजर आणि कौशल्ये प्रदान करेल. जगभरातील आरोग्य प्रणालींना योगदान देण्यासाठी तयार असलेल्या आरोग्य सेवा व्यावसायिकांच्या पुढच्या पिढीला सक्षम करण्याचा हा आमच्या कार्यबल विकास उपक्रमांमधील एक भाग आहे.

अलाईड हेल्थ सायन्सेस म्हणजे काय?

हे पॅरामेडिकल किंवा सपोर्टिव्ह हेल्थकेअर क्षेत्र आहे. डॉक्टर आणि नर्सेस रुग्णांचे मुख्य उपचार करतात, तर अलाइड हेल्थ प्रोफेशनल्स त्यांना आवश्यक तांत्रिक, डायग्नोस्टिक, थेरपी आणि इतर सेवा देतात. जागतिक आरोग्य संघटना आणि इतर संस्थांच्या व्याख्येनुसार हे व्यावसायिक रोग प्रतिबंध, निदान, उपचार आणि पुनर्वसनासाठी विशेष कौशल्ये वापरतात.



**अभ्यासक्रम**

- अॅनेस्थेशिया आणि ऑपरेशन थिएटर टेक्नॉलॉजी
- मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी
- क्रिटिकल केअर टेक्नॉलॉजी
- रेडिओलॉजी/इमेजिंग टेक्नॉलॉजी
- फिजिओथेरपी
- ऑक्युपेशनल थेरपी
- स्पीच आणि लँग्वेज थेरपी
- ऑप्टोमेट्री
- न्यूट्रिशन आणि डायटेटिक्स
- रेस्पिरेटरी थेरपी
- कार्डियाक केअर टेक्नॉलॉजी

# मी योग्य करतोय का?

मॅच मेकिंग



मी २२ वर्षांचा तरुण असून एक ओळखीतली मुलगी मला आवडते. ती २६ वर्षांनी असून एमडी करते आहे. माझं आर्किटेक्चरचं शिक्षण सुरू असून अजून एक वर्षं बाकी आहे. मधल्या काळात तिचं लग्न ठरलं. लवकरच तिचं लग्न होणार आहे. मी शिक्षणासाठी दुसऱ्या शहरात असल्यामुळे तिच्यासोबत फार वेळ घालवायची संधी मिळाली नाही. यंदाच्या ख्रिसमसला आम्ही भेटलो. तिच्यासोबत बराच वेळ घालवला. दोन दिवसांनी मी तिला मेसेज पाठवून प्रेमाची कबुली दिली. पण तिने नकार दिला. यानंतर तिने मला सोशल मीडियावर ब्लॉक केलं आहे. तिलाही मी आवडतो, असं मला वाटतं. पण लग्न ठरल्यामुळे ती काही बोलू शकत नाही. मीही तिच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केलेला नाही. तिला टाळणं योग्य आहे का? मला मार्गदर्शन करा.

उत्तर : तिच्या इच्छेचा मान ठेऊन तूही तिच्याशी संपर्क करणं बंद केलं आहेस. मला वाटतं तिच्याकडून प्रतिसाद मिळेपर्यंत तू तिच्याशी संपर्क करू नकोस. त्यातच तुम्ही दोघं आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर आहात. ती एमडी करते आहे तर तुझं आर्किटेक्चर व्हायचं आहे. तिच्या आयुष्याचा निर्णय घेतला आहे. नव्या नात्यासोबत तिला पुढे जायचं आहे. त्यामुळे तूही तिचा विचार करू नकोस. तिच्याकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही तर अजिबात उदास होऊ नकोस. तूही तुझ्या आयुष्यात पुढे जा. भविष्याचा विचार कर. तुलाही चांगला जोडीदार मिळेल.

# माहिती नोकरीच्या संधींची

रोजगारवाटा

भारतातील प्रोफेशनल्सनी परिवर्तनासाठी मोठ्या महत्त्वाकांक्षेसह नवीन वर्षामध्ये प्रवेश केला आहे. 'लिंक्डइन'च्या नवीन संशोधनामधून निदर्शनास येते, की, २०२६ मध्ये ७२ टक्के प्रोफेशनल्स नवीन पदाचा शोध घेत आहेत.

एक-तृतीयांशपेक्षा अधिक प्रोफेशनल्सना झपाट्याने बदलत असलेल्या तंत्रज्ञानासह नोकरी करण्यास आवश्यक असलेल्यान कौशल्यांसाठी (३८ टक्के) आणि आजच्या वाढत्या स्पर्धेदरम्यानन वरचढ ठरण्यासाठी (३८ टक्के) तयार नसल्याचेदेखील वाटते. प्रोफेशनल्सना या अनिश्चिततेमधून मार्ग काढण्यास मदत करण्यासाठी 'लिंक्डइन'ने आपली 'जॉब्ज ऑन द राइज' २०२६ लिस्ट जारी केली आहे. एआय टॅलेंटसाठी वाढती मागणी दिसून येते. तंत्रज्ञानाव्यातिरिक्त या लिस्टमध्ये इतर पदांचा देखील समावेश आहे. त्यात कॉन्फरन्स प्रोड्युसर, डायरेक्टर ऑफ फोटोग्राफी, ब्रँड कन्सल्टंट, स्ट्रॅटेजिक अॅडवायजर आणि व्हेटेरिनेरियनचा समावेश आहे. त्यातून शहरातील रोजगार बाजारपेठेत सर्जनशील, सल्लागार, नेतृत्व आणि विशेष व्यावसायिक क्षेत्रांमधील वाढ दिसून येते.

**मुंबईतील टॉप १० जॉब्ज ऑन द राइज**

१. एआय इंजीनिअर २. कॉन्फरन्स प्रोड्युसर
३. डायरेक्टर ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स
४. डायरेक्टर ऑफ फोटोग्राफी
५. ब्रँड कन्सल्टंट ६. स्ट्रॅटेजिक अडवायजर
७. रिसर्च इन्स्ट्रक्टर ८. अॅडव्हर्टायझिंग मॅनेजर ९. व्हेटेरिनेरियन



# महाराष्ट्रात मिनी श्रीलंका

भटकंती

स्वच्छ निळाशार समुद्र, शुभ्र वाळू, नारळ सुपारीची हिरवळ आणि शांत वातावरण यामुळे ओळखली जाणारी ही जागा म्हणजेच महाराष्ट्रातील 'मिनी श्रीलंका'. कमी खर्चात निसर्गाचा मनमुराद आनंद घ्यायचा असेल, तर हे ठिकाण तुमच्या ट्रॅव्हल लिस्टमध्ये नक्की असायलाच हवं.

तारकर्लीचा समुद्र अतिशय स्वच्छ आणि नितळ आहे. दूरवर पसरलेलं निळसर पाणी आणि शांत लाटा पाहिल्यावर मन अक्षरशः प्रसन्न होतं. इथलं वातावरण गजबजलेल्या पर्यटनस्थळांपेक्षा खूप वेगळं आणि निवांत आहे. तारकर्ली बीचची खासियत म्हणजे त्याची पांढरी, मऊ वाळू, पायाखालून सरकणारी वाळू आणि पारदर्शक पाण्यात दिसणारे सामुद्रतळाचे रंग श्रीलंकेतील समुद्रकिनाऱ्यांची आठवण करून देतात.

समुद्राच्या काठालगत उभ्या असलेल्या नारळ आणि सुपारीच्या उंच झाडांमुळे परिसर अधिकच निसर्गरम्य दिसतो. या झाडांमुळे इथे एक वेगळीच उष्णकटिबंधीय (ट्रॉपिकल) अनुभूती मिळते. देवबागमध्ये करळी नदी अरबी समुद्राला येऊन मिळते. हा क्षण प्रत्यक्ष पाहणे म्हणजे निसर्गाचे अद्भुत रूप अनुभवणे. बोटीतून या संगमाचा अनुभव घेता येतो. तो पर्यटकांना फार आवडतो. तारकर्ली हे महाराष्ट्रातील स्कूबा डायव्हिंगसाठी ओळखलं जाणारं ठिकाण आहे. रंगीबेरंगी मासे, प्रवाळ (कोरल्स) पाहण्याची संधी इथे मिळते. याशिवाय स्नॉर्केलिंग, जेट स्की, बोट राईड अशा अनेक अॅडव्हेंचर अॅक्टिव्हिटीज उपलब्ध आहेत. गोवा किंवा परदेशी बीचेप्रमाणे इथे प्रचंड गर्दी नसते. त्यामुळे कुटुंब, मित्रमंडळी किंवा जोडप्यांसाठी हे ठिकाण सुरक्षित, स्वच्छ आणि निवांत सुट्टी घालवण्यासाठी उत्तम आहे. पासपोर्ट,व्हिसा किंवा मोठा खर्च न करता इथे परदेशासारखी मजा घेता येते.

महाराष्ट्रात राहूनच श्रीलंकेसारखा फील हवा असेल तर तारकर्ली- देवबाग हा उत्तम पर्याय आहे. ऑक्टोबर ते मार्च हा काळ या भागाला भेट देण्यासाठी सर्वात चांगला मानला जातो. या महिन्यात हवामान आल्हाददायक असतं आणि समुद्रही तुलनेने शांत असतो.



# वसंत ऋतूत ब्रँडेड पोशाख

फॅशन पॅशन



या वसंत ऋतूत पोशाखांसाठी लोफर्स हा एक उत्तम पर्याय आहे. गेल्या काही वर्षांपासून, डेनिम ट्रेंड सातत्याने ट्रेंड करत आहे. तो गडद होत चालला आहे, आणि योगायोगाने असो वा नसो, लोक कठीण, कच्च्या जपानी जीन्सच्या जगात अधिक रस घेत आहेत. जे. क्रू, नॉर्डस्ट्रॉम, बक मेसन आणि असंख्य इतर ब्रँड सेल्व्हेज डेनिम देतात. हे नियमित जीन्सपेक्षा अधिक टिकाऊ आहे, पण तुम्हाला खर्च थोडा कमी करायचा असेल आणि स्ट्रेची जीन्स हवी असेल, तर लिव्हाइस आणि मेडवेल हे उत्तम पर्याय आहेत. तुमच्या जीन्सशी तुमचा टॉप जुळवून पूर्ण कॅनेडियन टक्सिडो लूक निवडा. तो आजकाल नेहमीपेक्षा कूल आहे, किंवा पांढऱ्या टी-शर्ट किंवा स्ट्राइप्ड बटण-डाउन शर्टसह त्याला एक नवीन ट्विस्ट द्या. 'ईस्ट कोस्ट प्रीपी' शैलीच्या वाढत्या ट्रेंडमध्ये एर्न जॅकेट बसतात; परंतु आता ते खूप लोकप्रिय झाले आहेत. टिकाऊपणा आणि व्यावहारिकतेसह सहज विंटेज आकर्षणाचे संयोजन करणारे हे जॅकेट वसंत ऋतूसाठी परिपूर्ण आहेत. शॉर्ट्ससह घालण्यासाठी पुरेसे हलके, थंड वारा सहन करण्यासाठी पुरेसे उबदार आणि तुमच्या दैनंदिन जीवनावश्यक वस्तू वाहून नेण्यासाठी सर्व खिसे असलेले प्राडा आणि मार्गिएला सारख्या ब्रँडचे जॅकेट मिळू शकतात.

# नकारात्मक प्रचारामुळे विरोधकांचा पराभव

## मंत्री बावनकुळे यांचा दावा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :
नकारात्मक प्रचारामुळे जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत काँग्रेससह सर्वच विरोधी पक्षांचा पराभव झाल्याचा दावा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महायुतीला राज्यात मोठे यश मिळाल्याचेही ते यावेळी म्हणाले.

राज्यातील १२ जिल्हा परिषदा व १२५पंचायत समित्यांसाठी गत शनिवारी निवडणूक झाली होती. त्यानंतर आज झालेल्या मतमोजणीत सत्ताधारी महायुतीचा बहुतांश जागांवर विजय झाला, तर विरोधी बाकावरील महाविकास आघाडीने आपली पराभवाची मालिका सुरू ठेवली. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना महाविकास आघाडीच्या पराभवासाठी त्यांचा नकारात्मक प्रचार कारणीभूत ठरल्याचा दावा केला.

ते म्हणाले, आम्ही निवडणुकीच्या प्रचाराला गेलो, तेव्हा आम्ही ग्रामीण भागातील जनतेपुढे केंद्रातील नरेंद्र मोदी व राज्यातील देवेंद्र फडणवीस यांच्या डबल इंजिन सरकारच्या योजना मांडल्या. आज मला आनंद वाटतो की, फडणवीस यांच्या नेतृत्वात आज आम्हाला महाराष्ट्रात एक मोठे यश मिळाले.

पुणे जिल्हा परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसचा विजय झाला. हा जिल्हा अजित पवार यांच्याच पाठिशी आहे. येथे अजित पवारांना मते मिळाली असले तरी ती पर्यायाने महायुतीलाच मिळाली आहेत. महाराष्ट्रात महायुतीचाच विजय होईल. त्यानंतर काही अजित पवारांचे, तर काही एकनाथ शिंदे यांचे अध्यक्ष होतील. अधिकाधिक ठिकाणी भाजपचे अध्यक्ष होतील. पण महाराष्ट्रात सर्वत्र महायुतीचेच चित्र दिसेल हे निश्चित आहे.

या निवडणुकीत विरोधी पक्षांना मोठा दणका बसल्याची बाब पत्रकारांनी यावेळी चंद्रशेखर बावनकुळेंच्या निदर्शनास आणून दिली. त्यावर ते म्हणाले, या निवडणुकीत महाविकास आघाडी नेमकी खाली गेली आहे. कारण, त्यांच्या भूमिका चूकत आहेत.

टीकाटिप्पणी करण्याच्या भूमिकेला आता महाराष्ट्र मत देत नाही. महाराष्ट्र विकासाला मतदान करतो. त्यामुळे टीकाटिप्पणीवर काही मतदान मिळणार नाही. निगेटिव्ह बोलून मतदान मिळणार नाही. काँग्रेसने या निवडणुकीत नकारात्मक प्रचार केला. त्यामुळे जनतेने त्यांना नाकारले.

शरद पवार महाविकास आघाडीला मार्गदर्शन करण्यात कमी पडले. त्यांनी ते मार्गदर्शन केले असले तरी, त्यांचे निकाल अत्यंत वाईट आले आहेत. या प्रकरणी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आत्मपरिक्षण केले पाहिजे. काँग्रेसच्या आतापर्यंत भूमिकाच चुकत आल्यात. त्यांच्या भूमिका या नकारात्मक आहेत. त्यांनी सकारात्मक प्रचार करण्याची गरज होती. विकासाच्या योजना मांडण्याची गरज होती. काँग्रेसची स्थिती महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात वाईट आहे. कारण, त्यांच्याकडे कोणतेही व्हिजन नाही. जिथे व्हिजन नाही, तिथे जनता नाही. जिथे व्हिजन आहे, तिथे लोकं आहेत, असेही बावनकुळे म्हणाले

# महापौर, उपमहापौर व सत्ता पक्षनेत्यांनी स्वीकारला पदभार



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :
नवनिर्वाचित महापौर श्रीमती नीता ठाकरे, उपमहापौर श्रीमती लीलाताई हाथीबेड व नागपूर महानगरपालिका सभागृहातील सत्ता पक्षनेते नरेंद्र (बाल्या) बोरकर यांनी आज नागपूर महानगरपालिकेच्या मुख्यालयात झालेल्या दिमाखदार कार्यक्रमानंतर पदभार स्वीकारला.

नागपूर महानगर पालिकेच्या मुख्यालयातील प्रशासकीय इमारतीमध्ये झालेल्या या कार्यक्रमाला राज्याचे महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार कृष्णा खोपडे, आमदार मोहन मते, माजी महापौर व भाजपचे शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी, माजी खासदार अजय संचेती, राज्य सफाई कामगार कल्याण मंडळाचे अध्यक्ष सतीश डागोर, माजी आमदार अनिल सोले, माजी आमदार विकास कुंभारे, माजी आमदार डॉ. मिलिंद माने, महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त श्रीमती वैष्णवी बी., भाजपचे नेते संजय भेंडे, बंटी कुकडे, जयप्रकाश गुप्ता, राजेश बागडी, विक्की कुकरेजा उपस्थित होते.

यावेळी माजी महापौर श्रीमती अर्चना डेहनकर, माजी महापौर श्रीमती मायाताई इवनाते माजी स्थायी समिती अध्यक्ष श्री. पिंटू झलके यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे नवनिर्वाचित नगरसेवक तसेच पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री बावनकुळे यांनी नवनिर्वाचित नगरसेवकांनी मतदारांप्रती निष्ठावान राहण्याचे आवाहन केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या यशस्वी नेतृत्वात नागपूर शहर विकासाचे एक एक टप्पा पुढे टाकत आहे. या शहराला २०४७ मध्ये विकसित नागपूर करण्याचा संकल्प या निमित्ताने सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी व नगरसेवकांनी घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी बोलताना महापौर श्रीमती नीता ठाकरे यांनी महापौरपदाच्या या नव्या संधी सोबत जनतेच्या विकासाची जबाबदारी असल्याचे सांगितले. निवडणुकीच्या माध्यमातून जनतेनी दाखविलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनात शहराला विकासाचे नवे आयाम देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना सत्ता पक्षनेते नरेंद्र (बाल्या) बोरकर यांनी पदाधिकारी व प्रशासनासोबत समन्वयाने काम करून शहराचा विकास साधण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असे सांगितले.

प्रारंभी नागपूर महानगरपालिका प्रशासनातर्फे अतिरिक्त आयुत्त श्रीमती वसुमना पंत यांनी महापौर श्रीमती नीता ठाकरे यांचे तर उपमहापौर श्रीमती लीलाताई हाथीबेड यांचे अतिरिक्त आयुक्त श्रीमती वैष्णवी बी. यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

सत्ता पक्षनेते नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर यांचे स्वागत उपायुक्त श्री. निर्भय जैन यांनी केले. यावेळी आमदार कृष्णा खोपडे, आ. मोहन मते व माजी खासदार अजय संचेती यांची भाषणे झाली.

कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी यांनी केले तर आभार नगरसेवक श्रीकांत आगलावे यांनी मानले. नागपूर महानगरपालिकेतील नव्या प्रशासकीय इमारतीमध्ये स्वागत समारंभानंतर महापौर श्रीमती नीता ठाकरे, उपमहापौर श्रीमती लीलाताई हाथीबेड, सत्ता पक्षनेते नरेंद्र (बाल्या) बोरकर यांनी आपल्या आपल्या कक्षात जाऊन विधिवत पदग्रहण केले.

यावेळी पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, माजी महापौर श्री. दयाशंकर तिवारी यांच्यासह भाजपचे नेते उपस्थित होते. महापौर, उपमहापौर तथा सत्तापक्ष नेता यांच्या समर्थकांनी त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

# धानाकरिता १३०६.४६ कोटी, भरडधान्यकरिता २१.८४ कोटी निधी वितरित

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :
राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाला किमान आधारभूत किंमत (एमएसपी) मिळावी व बाजारभावातील चढ-उतारापासून संरक्षण मिळावे, यासाठी खरीप हंगाम २०२५-२६ अंतर्गत धान खरेदी योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

या योजनेतर्गत शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या धान्याचा मोबदला वेळेत अदा करता यावा, यासाठी राज्य शासनामार्फत संबंधित खरेदी संस्थांना निधी वितरित करण्यात आल्याचे अन्न नागरी पुरवठा विभागाने कळविले आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महासंघ तसेच जिल्हास्तरीय सहकारी संस्था यांच्या माध्यमातून जिल्हानिहाय अधिकृत खरेदी केंद्रे सुरू करण्यात आली असून, निर्धारित गुणवत्ता निकषांनुसार भात, मका व ज्वारी खरेदी केली जात आहे. शेतकऱ्यांची नोंदणी, धान्याची गुणवत्ता तपासणी, अधिकृत वजन आणि हमी भावानुसार थेट बँक खात्यात देयक जमा करण्याची पारदर्शक प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे.

खरेदी प्रक्रिया सुरळीत व गतिमान राहावी तसेच शेतकऱ्यांना देयके वेळेत मिळावीत, यासाठी राज्य शासनाने धानाकरिता रू १३०६.४६ कोटी व भरडधान्यकरिता रू २१.८४ कोटी निधी वितरित केला आहे.

सदर निधीमुळे खरेदी केंद्रांवरील साठवणूक, वाहतूक, मनुष्यबळ व देयक वितरण व्यवस्था अधिक सक्षम होणार असून, विशेषतः आदिवासी व दुर्गम भागातील शेतकऱ्यांना हमीभावाचा लाभ वेळेत मिळण्यास मदत होणार आहे. राज्य शासन शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध असून, धान खरेदी पारदर्शक, कार्यक्षम व नियोजित कालावधीत पूर्ण करण्यासाठी यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# रिल्सची राणी पराभूत

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ९ :
शिरुर तालुक्यातील कारेगावच्या माजी सरपंच निर्मला नवले यांना पंचायत समिती निवडणुकीत अनपेक्षित पराभवाचा सामना करावा लागला. राष्ट्रवादी काँग्रेसकडून त्या कारेगाव-कान्हूर मेसाई गणातून रिंगणात उतरल्या होत्या.



सोशल मीडियावर प्रचंड फॅन फॉलोअिंग असलेला चेहरा म्हणून त्यांची ओळख असूनही, मतपेटीत मात्र त्यांची लोकप्रियता मतांमध्ये रूपांतरित होऊ शकली नाही. भाजपच्या मनीषा सतीश पाचंगे यांनी नवले यांचा पराभव केला.

निर्मला नवले या सोशल मीडियावर कायम चर्चेत असतात. त्यांच्या रिल्स, व्हिडीओ आणि वेगळ्या स्टाईलमुळे त्या नेहमीच व्हायरल होत राहिल्या आहेत. राजकारणात सक्रिय असतानाही त्यांनी सोशल मीडियावर आपली वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या लोकप्रियतेमुळे त्यांना रिल्सची राणी अशीही ओळख मिळाली होती.

# महिलांच्या सुरक्षिततेसाठी कायदे कडक करा



## उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचे निर्देश

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :
महिलांवरील अत्याचार, छळ आणि कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांना आळा घालण्यासाठी अस्तित्वात असलेले कायदे अधिक प्रभावी आणि काटेकोरपणे अंमलात आणणे आवश्यक आहे, असे विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नमूद केले.

कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महिला व बाल विकास विभागाचे संरक्षण अधिकारी आणि पोलीस विभागाच्या भरोसा सेलच्या अधिकाऱ्यांची एकत्रित जिल्हा व तालुका तर शहरात झोन निहाय समन्वय बैठका घेण्यात याव्यात अशी स्पष्ट सूचना त्यांनी दिली.

विधानभवनात आयोजित उच्चस्तरीय बैठकीत कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, २००५ अधिक परिणामकारक करण्याबाबत, शक्ती विधेयक अंमलबजावणीच्या अनुषंगाने पुढील दिशा ठरविण्याबाबत तसेच अर्नेश कुमार विरुद्ध बिहार राज्य या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयातील सुधारणा याचिकेवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बीएनएस प्रमाणे कार्यप्रणालीत ३५ अ ते आय या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी पोलिसांनी केल्यास पिडीतांना दिलासा मिळेल म्हणुन पोलिसांनी योग्य ती कार्यप्रणाली तयार करावी अशाही सूचना उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिल्या . पुढील एका महिन्यात पाठपुरावा करून तपशील ठरवावा असेही सुचवण्यात आले. या बैठकीचा अहवाल मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री शिंदे, सुनेत्राताई पवार यांचेकडे पाठविण्यात येणार असल्याचे गोऱ्हे म्हणाल्या.

# निरोगी शरीरासाठी पाणी पिण्याचे फायदे

## लोकारोग्य




मानवाच्या शरीरात सुमारे ७० टक्के पाणी असते. आपल्या सर्वांनाच रोज पाणी पिण्याची आवश्यकता असते. शरीरातील सर्व अवयवांना (त्यांची) प्रक्रिया करण्यासाठी योग्य प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. शरीराची सर्व कार्य योग्य रितीने चालावीत यासाठी योग्य आणि पुरेशा प्रमाणात पाणी पिणे महत्वाचे आहे. उष्णता आणि बदलते हवामान, ताप किंवा उलट्या-जुलाब अशा अनेक कारणांमुळे शरीरात डिहायड्रेशनचा त्रास होऊ शकतो. ज्यामुळे अनेक समस्या आणि गंभीर आजारांचाही सामना करावा लागू शकतो. त्यामुळेच पुरेसे पाणी पिण्याचे शरीरासाठी नेमके काय फायदे आहेत? याविषयी सविस्तर जाणून घेण्यसाठी आहारतज्ञ डॉ.सुरेश देवल यांचाशी संवाद

**पुरेशा प्रमाणात पाणी पिण्याचे फायदे काय आहेत?**

■ पचन, रक्ताभिसरण, शरीराचे योग्य तापमान राखणे, पोषक तत्वांची निर्यात करणे आणि लाळ तयार करणे अशा इतर अनेक कार्यासाठी पाण्याची गरज असते. पिट्यूटरी ग्रंथी ही मेंदूशी संवाद साधते आणि शरीरातील द्रवपदार्थ नियंत्रित करते. शरीराच्या बहुतांश कामांसाठी पाणी अत्यावश्यक असते, त्यामुळे पुरेशा प्रमाणात पाणी पिणे गरजेचे आहे.

**पाणी पिण्यामुळे त्वचा देखील निरोगी राहते का ? पोटाच्या समस्यांवर देखील पाणी उत्तम उपाय आहे का?**

■ चांगल्या आणि निरोगी त्वचेसाठी पाणी हे खूप महत्वाचे आहे. पाण्याची कमतरता म्हणजेच डिहायड्रेशनमुळे आपली त्वचा कोरडी आणि निर्जीव होते. त्वचा घट्ट, तरुण आणि सुंदर ठेवण्यासाठी पाणी पिणे हा एक नैसर्गिक उपाय आहे, ज्यामुळे त्वचेतील ओलावा कायम राहण्यास किंवा लॉक होण्यास मदत मिळते. पुरेसे पाणी प्यायल्याने आपले पोट निरोगी राहते आणि पचनक्रियाही योग्य राहते. पाण्यामध्ये फायबर्स असतात, त्याचे सेवन करून बद्धकोष्ठतेच्या समस्येचे निदानही करता येते.

**मूत्रपिंडाच्या विविध आजारापासून बचाव करण्यासाठी पाणी कसे उपयुक्त ठरते?**

■ शरीरात असलेले टाकाऊ पदार्थ बाहेर काढून टाकण्याचे काम द्रव पदार्थांमुळे होते. किडनी ही वॉटर सोल्युबल वेस्ट (टाकाऊ पदार्थ) लघवीद्वारे शरीरातून बाहेर काढते. किडनी ही शरीर स्वच्छ करण्याचे आणि शुद्धीकरण करण्याचे काम करते. किडनीचे कार्य नियमितपणे व योग्यपणे चालावे यासाठी पुरेसे पाणी पिणे आवश्यक आहे.

**गरम पाणी पिण्याचे फायदे काय आहेत?**

■ जर तुम्हाला निरोगी जीवनशैली सुरू करायची असेल, तर सकाळी गरम पाणी प्या. गरम पाण्याचे अनेक आरोग्य फायदे आहेत जे तुमचे एकूण आरोग्य वाढवू शकतात.गरम पाणी तुमच्या पचनसंस्थेला चालना देते आणि नैसर्गिक स्नेहन म्हणून काम करते. ते तुमच्या पोटाला अन्नाचे विघटन करण्यास आणि आतड्यांमधून जाण्यास मदत करते.

कोमट किंवा गरम पाणी तुमच्या शरीराचे अंतर्गत तापमान वाढवू शकते (ज्यामुळे घाम वाढू शकतो आणि मूत्रपिंडाचे कार्य चांगले नियंत्रित होऊ शकते) ज्यामुळे हानिकारक विषारी पदार्थ आणि कचरा अधिक कार्यक्षमतेने बाहेर पडण्यास मदत होते. गरम पाणी तुमच्या रक्तवाहिन्या वाढवते, ज्यामुळे संपूर्ण शरीरात रक्त प्रवाह सुधारतो. रक्ताभिसरण सुधारल्याने शरीराच्या महत्त्वाच्या अवयवांना आणि ऊतींना ऑक्सिजन आणि पोषक तत्वांचा पुरवठा जास्त होतो.

■ ■ ■

## जनआरोग्य



कर्करोग... याचा उल्लेख जरी झाला तरी भल्याभल्यांना घाम फुटतो... कर्करोग प्रतिबंध कसा करायचा? याबाबत अनेकांना माहिती नसते, दरवर्षी ४ फेब्रुवारी रोजी जागतिक कर्करोग दिन साजरा केला जातो. या दिवशी कर्करोग आणि लसीकरणाबाबत अनेकांना माहिती दिली जाते.

लसीकरण हे आरोग्याच्या दृष्टीने एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. आतापर्यंत आपण लसीकरणाला प्रामुख्याने पोलिओ, गोवर यांसारख्या बालपणी होणाऱ्या आजारांपासून संरक्षण म्हणून पाहिले आहे. मात्र अनेकांना हे माहित नसते की काही लसी कर्करोग होण्याचा धोका कमी करण्यासही मदत करतात. ही माहिती भारतीय कुटुंबांसाठी खूप महत्त्वाची आहे, कारण योग्य वेळी योग्य लस घेतल्यास भविष्यात कर्करोगाचा धोका कमी होऊ शकतो

ह्युमन पॅपिलोमा व्हायरस (HPV) हा एक सामान्य विषाणू आहे आणि तो जगभरात मोठ्या प्रमाणावर आढळतो. महिलांमध्ये गर्भाशय मुखाचा (सर्व्हायकल) कर्करोग होण्याचे हे एक मुख्य कारण आहे. याशिवाय पुरुष आणि महिलांमध्ये घसा, गुदद्वार आणि जननेंद्रियांचा कर्करोग होण्यामागेही हा विषाणू कारणीभूत ठरतो. तरीसुद्धा भारतामध्ये ल्ढश लसीकरणाबाबत अजूनही पुरेशी माहिती आणि जागरूकता नाही. HPV लस विषाणूचा संसर्ग होण्यापूर्वी दिल्यास सर्वाधिक परिणामकारक ठरते. साधारणपणे ९ ते १४ वर्षे या वयोगटात ही लस देणे योग्य मानले जाते. मात्र मोठ्या वयातील किशोरवयीन मुले आणि तरुण प्रौढांनाही या लसीचा फायदा होऊ शकतो.

फक्त मुलींनाच नाही तर मुलांनाही ही लस दिल्यास भविष्यात होणारे अनेक प्रकारचे कर्करोग टाळता येतात.जगातील अनेक देशांनी HPV लसीकरणाचे महत्त्व ओळखले आहे. त्यामुळे अनेक देशांमध्ये ही लस राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आली आहे किंवा सरकारी स्तरावर उपलब्ध करून दिली जाते. लसीचा वापर वाढल्यामुळे आणि सरकारी पाठबळामुळे ही लस आता अधिक परवडणारी आणि सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचत आहे. ■ ■

### स्फिग्मोमॅनोमीटर



स्फिग्मोमॅनोमीटर हे मानवी शरीरातील धमनीचा रक्तदाब मोजण्यासाठी वापरले जाणारे एक महत्त्वाचे वैद्यकीय उपकरण आहे, ज्याला सोप्या भाषेत 'ब्लड प्रेशर मशीन' किंवा 'रक्तदाब मापक' म्हणतात. यामध्ये फुगवता येण्याजोगा रबर कफ दाब मोजणारे उपकरण आणि हवेचा पंप असतो, जो हाताच्या बाहूला गुंडाळून सिस्टोलिक आणि डायस्टोलिक दाब मोजतो. या उपकरणाचा शोध सॅम्युअल सिगफ्रीड कार्ल रिटर फॉन बाश यांनी १८८१ मध्ये लावला.

**मर्क्युरी स्फिग्मोमॅनोमीटर :** हे सर्वात अचूक मानले जाते, ज्यात पाऱ्याच्या स्तंभाच्या उंचीद्वारे दाब मोजला जातो.

**एनरोइड स्फिग्मोमॅनोमीटर :** यामध्ये पाऱ्याऐवजी डायल आणि सुई असते. डिजिटल स्फिग्मोमॅनोमीटर हे इलेक्ट्रॉनिक उपकरण आहे, जे आपोआप वाचन देते. या उपकरणाचे कार्य म्हणजे कफ दंडावर बांधून तो फुगवला जातो, ज्यामुळे धमनीतील रक्तप्रवाह तात्पुरता थांबतो. नंतर हवा हळूहळू सोडली जाते आणि स्टेथोस्कोपच्या साहाय्याने हृदयाचे ठोके ऐकून (ऑस्कल्टरी तंत्र) दाब मोजला जातो. रक्तदाब मोजणे (हायपरटेन्शन किंवा हायपोटेन्शन) जाणून घेण्यासाठी हे अत्यावश्यक आहे.

■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## परीक्षा काळात सीसीटीव्ही कॅमेरे नसलेल्या केंद्रांवर

# अन्य शाळांमधील केंद्र संचालक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :
इयत्ता बारावी आणि दहावीच्या परीक्षा काळात कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत सर्व परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बंधनकारक करण्यात आले आहेत. मुंबई विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाअंतर्गत कॅमेरे नसलेल्या केंद्रांची संख्या ५८ वरुन ११ इतकी कमी झाली असल्याची माहिती मुंबई विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सचिव ज्योत्स्ना शिंदे-पवार यांनी दिली आहे.

ज्या परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे उपलब्ध नाहीत अशा परीक्षा केंद्रांवर केंद्र संचालक व सर्व कर्मचारी अन्य शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातून नियुक्त करण्यात येणार आहेत. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (१२ वी) लेखी परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. तसेच माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (१० वी) परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे.

# दारूच्या नशेत मित्राचाच खून

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :
मद्यप्राशनानंतर झालेल्या किरकोळ वादातून तीन मित्रांनी मिळून चौथ्या मित्राचा निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

रमेश उर्फ वैद्य मुकुंदरावर मसराम (३७, रा. बुद्धाजी नगर) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणात पाचपावली पोलिसांनी शंकर भैसारे (४२), कपिल नगरारे (४५) आणि जसवंत सिंग अडी (५३) या तिघांना ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनेच्या आदल्या दिवसापासून हे चौघे शंकर भैसारेच्या घरी एकत्र मद्यप्राशन करत होते. रविवारी सकाळपासूनच पुन्हा मद्यप्राशन सुरू झाले.

सायंकाळच्या सुमारास कसल्यातरी कारणावरून मित्रांमध्ये वाद झाला. मद्याच्या अंमलात हा वाद टोकाला गेला आणि लाठीकाठीने झालेल्या हल्ल्यात रमेश रक्ताच्या थारोळ्यात कोसळला.

दुसऱ्या दिवशी सकाळी रमेश मृतावस्थेत आढळून आला, तर त्याच्या शेजारीच शंकर भैसारे बेशुद्धावस्थेत पडलेला होता. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत दोघांनाही मेयो रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी रमेशला मृत घोषित केले.

रमेशवर नेमका कोणी आणि कशा प्रकारे हल्ला केला, याबाबत अद्याप स्पष्टता नसली तरी एकत्र मद्यप्राशन करणाऱ्या तिघांना संशयाच्या आधारे ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

विशेष म्हणजे, पाचपावली परिसरात गेल्या काही महिन्यांतील ही दुसरी खुनाची घटना आहे. सुमारे नऊ महिन्यांपूर्वी १० क्रमांक पुलाजवळील खासगी दंत रुग्णालयासमोर दगडाने डोके ठेचून एका व्यक्तीचा खून झाला होता. त्या घटनेनंतर पुन्हा एकदा घडलेल्या या खुनामुळे परिसरातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

## राज्यातील १२ जि. प.मध्ये पक्षनिहाय मिळालेल्या जागा

| पक्ष | जागा |
|---|---|
| **रत्नागिरी जिल्हा परिषद** | |
| भाजप | ०२ |
| शिवसेना | ३६ |
| राष्ट्रवादी काँग्रेस | ४ |
| शिवसेना ठाकरे गट | १ |
| काँग्रेस | ० |
| राष्ट्रवादी शप गट | ० |
| मनसे | १ |
| **सिंधुदुर्ग जिल्हा परिषद** | |
| भाजप | २१ |
| शिवसेना | ८ |
| शिवसेना ठाकरे गट | २ |
| काँग्रेस | ० |
| राष्ट्रवादी काँग्रेस | ० |
| अपक्ष | ५ |
| **पुणे जिल्हा परिषद** | |
| भाजप | ८ |
| शिवसेना | ५ |
| राष्ट्रवादी अप गट | ४३ |
| राष्ट्रवादी शप गट | १ |
| ठाकरे गट | ७ |
| काँग्रेस | ० |
| **सातारा जिल्हा परिषद** | |
| भाजप | ३२ |
| शिवसेना | १० |
| राष्ट्रवादी | १८ |
| ठाकरे गट | ० |
| काँग्रेस | ० |
| **सांगली जिल्हा परिषद** | |
| भाजप | १८ |
| राष्ट्रवादी अप गट | ७ |
| काँग्रेस | ११ |
| शिवसेना शिंदे गट | ७ |
| राष्ट्रवादी शप गट | १५ |
| शिवसेना ठाकरे गट | १ |
| जनसुराज्य | १ |
| रयत क्रांती(खोत) | १ |
| **कोल्हापूर जिल्हा परिषद** | |
| भाजप | १२ |
| शिवसेना (शिंदे) | ७ |
| राष्ट्रवादी | १६ |
| काँग्रेस | १३ |
| शिवसेना (ठाकरे) | १ |
| जनसुराज्य | ५ |
| स्वाभि. शेत. संघटना | 3 |
| शाहू आघाडी | |
| राजेंद्र यड्रावकर गट | ४ |

| पक्ष | जागा |
|---|---|
| **सोलापूर जिल्हा परिषद** | |
| भाजप | ३७ |
| शिवसेना | ७ |
| राष्ट्रवादी | ९ |
| ठाकरे गट | ० |
| काँग्रेस | ० |
| इतर | ३ |
| **छ. संभाजीनगर जिल्हा परिषद** | |
| भाजप | २२ |
| शिवसेना | १९ |
| शिवसेना ठाकरे | ८ |
| राष्ट्रवादी अप गट | २ |
| राष्ट्रवादी शप गट | १ |
| काँग्रेस | १ |
| वंचित | ० |
| एमआयएम | ० |
| अपक्ष | ७ |
| **परभणी जिल्हा परिषद** | |
| भाजप | २१ |
| शिवसेना | ५ |
| शिवसेना ठाकरे गट | ३ |
| राष्ट्रवादी अप गट | ११ |
| काँग्रेस | ३ |
| **धाराशिव जिल्हा परिषद** | |
| भाजप | १२ |
| शिवसेना शिंदे गट | १२ |
| शिवसेना ठाकरे गट | ५ |
| राष्ट्रवादी काँग्रेस | ५ |
| राष्ट्रवादी शप गट | ० |
| काँग्रेस | २ |
| समाजवादी पक्ष | १ |
| इतर | ४ |
| **लातूर जिल्हा परिषद** | |
| भाजप | १६ |
| काँग्रेस | १५ |
| शिवसेना | २ |
| शिवसेना ठाकरे गट | ० |
| राष्ट्रवादी अप गट | १० |
| राष्ट्रवादी शप गट | १ |
| मनसे | १ |
| इतर | २ |
| **रायगड जिल्हा परिषद** | |
| भाजप | १२ |
| शिवसेना | १६ |
| राष्ट्रवादी काँग्रेस | १६ |
| शिवसेना ठाकरे गट | ५ |
| काँग्रेस | १ |